शुक्रवार, २८ एप्रिल २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२३३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • FRIDAY 28 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-233 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# ...तर अनैतिक संबंधांना संरक्षण मिळेल

## समलिंगी विवाह कायदा सुनावणी : केंद्राचा सर्वोच्च न्यायालयात युक्तीवाद

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : समलिंगी विवाह कायद्यासाठी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. गुरुवारी सुनावणीचा सहावा दिवस होता. आजच्या दिवशीही सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकारची बाजू लावून धरली. जोडीदार निवडीच्या अधिकाराचा मुद्दा उपस्थित करून याचिकाकर्त्यांनी समलिंगी विवाह कायद्याची मागणी केली आहे. मात्र, या विवाहाला मान्यता दिल्यास अनैतिक संबंधांनाही संरक्षण मिळेल, असे तुषार मेहता यांनी म्हटले आहे.**



एखादा व्यक्ती प्रतिबंधित असलेल्या नात्यातच आकर्षित झाला तर? एखादा व्यक्ती आपल्या बहिणीलाच आकर्षित झाला तर ते म्हणू शकतात की आम्ही प्रौढ आहे, आम्ही आमच्या खासगी आयुष्यात काहीही करू शकतो. आम्हाला जोडीदार निवडीचा अधिकार आहे. याच युक्तिवादाच्या आधारे कोणी आव्हान देऊ शकत नाही का? या विवाहासाठी निर्णय घेणारे तुम्ही कोण आहात? असा सवाल सॉलिसिटर जनरल यांनी उपस्थित केला. बहिणीशी लग्न करण्याच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रचूड म्हणाले की, ही फार दूरची गोष्ट आहे. त्यावर तुषार मेहता यांनीही तत्काळ उत्तर देत, समलिंगी विवाहही आम्हाला फार दूरचीच गोष्ट वाटत होती असे म्हटले. सरन्यायाधीश डी.वाय चंद्रचूड, न्यायमूर्ती संजय किशन कौल, एस. रवींद्र भट, हिमा कोहली आणि पीएस नरसिंहा यांच्या घटनापीठासमोर सहाव्या दिवशी सुनावणी झाली.

तुषार मेहतांनी समलिंगी विवाहावरून बहुपत्नीत्वाचा मुद्दाही अधोरेखित केला. जोडीदार निवडीवरून माझी निवड बहुपत्नीत्व आहे, असेही लोक म्हणू शकतात, असे मेहता म्हणाले. लग्नाविषयीचे नियम सार्वत्रिक आहे. हे नियम कायदेशीर तयार केले नव्हते तेव्हाही ते स्वीकारले होते. हा एक आदर्श कायदा होता. समलिंगी विवाहांना परवानगी द्यायची झाली तर तब्बल १६० तरतुदींवर परिणाम होईल, त्यामुळे देशाच्या वैधानिक चौकटीत मतभेद निर्माण होऊ शकतील, असे तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात नमूद केले.



# गारपीट-मुसळधार पावसाचे थैमान

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** गुरुवारी पहाटेपासून झालेल्या मुसळधार पावसात फळबागांना मोठा फटका बसला. देवळी तालुक्यात एक म्हैस तसेच समुद्रपूर तालुक्यात दोन बैल वीज पडल्याने मृत्युमुखी पडले. देवळी तालुक्यातील कोल्हापूर येथील सुभाष गामे यांच्या घराचे टिनाचे छत उडून गेले. गोठ्यांचे नुकसान झाले. गावात लिंबाएवढ्या गारांचा खच पडला. गावकरी या प्रकोपने हादरून गेले आहेत. हिंगणघाट येथे सर्वाधिक ३५ मिमी पाऊस पडला, तर कानदगाव मंडळात ४९ मिमी अशी विक्रमी पर्जन्यमान झाले आहे. आष्टी, आर्वी, कारंजा येथील संत्रा तर सेलू तालुक्यात पपई बाग उद्‌ध्वस्त झाली आहे. आर्वी, सेलू, वर्धा येथील फुलशेतीचे पण मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.




# सौर ऊर्जेद्वारे शेतकऱ्यांसाठी ७००० मेगावॅट वीजनिर्मितीमुळे ग्रामीण विकासाला चालना

## महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक

आधुनिक केसरी न्यूज




**छत्रपती संभाजीनगर :** सौर ऊर्जेचा वापर करून 7000 मेगावॅट वीजनिर्मिती करायची व त्याद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करायचा यासाठी शिंदे फडणवीस सरकारने सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – 2.0' मुळे शेतकऱ्यांच्या आयुष्यात चांगला बदल घडविण्याबरोबरच ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळेल, असे प्रतिपादन महावितरणचे स्वतंत्र संचालक आणि भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत केले.

ते म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – 2.0 हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. मा. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतीच अभियानास व त्या अंतर्गत 'मिशन 2025'ला सुरुवात झाली. त्यानुसार सौर ऊर्जेचा वापर करून डिसेंबर 2025 पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किमान 30 टक्के कृषी फीडर्स सौरऊर्जेवर चालविण्यात येतील. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा व भरवशाचा वीजपुरवठा होईल. त्यांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण होईल. राज्यात 45 लाख कृषी पंपधारक शेतकरी आहेत व त्या सर्वांसाठी आगामी काळात हे अभियान महत्त्वाचे ठरणार आहे. या अभियानाच्या अंतर्गत राज्यात वीजनिर्मितीसाठी 30,000 कोटी रुपयांची गुंतवणूक होईल. सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी जमीन भाड्याने देऊन हेक्टरी सव्वा लाख रुपये वार्षिक भाडे मिळविण्याची शेतकऱ्यांना संधी मिळेल. हे भाडे दरवर्षी तीन टक्के दराने वाढणार आहे. तसेच सौर उर्जा निर्मिती प्रकल्पांच्या उभारणीत सक्रीय सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य शासनाकडून विकासकामांसाठी पाच लाख रुपये प्रोत्साहन निधी तीन वर्षांसाठी मिळणार आहे. ते म्हणाले की, या अभियानाचा शुभारंभ करताना मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी काळात गावातील ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, दवाखाना, पाणी पुरवठा योजना सौर उर्जेवर चालविण्यासाठी नियोजन करण्यास सरकारी यंत्रणेला सांगितले आहे.

शेतीसाठी दिवसा आणि रात्री वीजपुरवठा होतो. रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यांना दिवसा भरवशाचा वीजपुरवठा व्हावा यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्यकाळात जून 2017 मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्यात आली होती. योजनेची अंमलबजावणी महावितरणमार्फत केली जाते. योजनेत आतापर्यंत 553 मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत आणि त्यातून 230 कृषी फीडर्सवरील एक लाख शेतकऱ्यांना पंपासाठी दिवसा वीजपुरवठा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – 2.0' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अन्न हे पूर्णब्रह्म...

आधुनिक केसरी

लोक जेवत असतानाही या अन्न वाचवा समितीचे लोक हातात फलक घेऊन लोकांना अन्न वाया जाणार नाही एवढेच घ्या, उष्टे टाकू नका असे आवाहन करीत होते. त्याचा परिणाम उपस्थितांवर बऱ्यापैकी होताना दिसत होता. दुसऱ्या एका पत्रकात अक्षतारूपी वाया जाणारे तांदूळ वाचवून तो गरिबाला द्या असे आवाहन केले होते. एका लग्नात सरासरी पाच किलो तांदूळ किंवा ज्वारी अक्षदा म्हणून वापरली जाते. वधूवरांपर्यंत पोहोचणाऱ्या आणि उधळल्या जाणाऱ्या एक किलो अक्षदा सोडल्या तर चार किलो तांदळाची नासाडी होते. आपल्या महाराष्ट्र राज्यात वर्षाला सरासरी दीड लाख विवाह साजरे होतात. म्हणजेच लाखो किलो तांदूळ किंवा ज्वारीची नासाडी होते. अन्न वाचवा समितीचे सदस्य निरनिराळ्या मंगल कार्यालयात जाऊन लोकांना ही अन्नाची नासाडी वाचवण्याचे आवाहन करतात. एस टी महामंडळातून सेवानिवृत्त झालेले अभियंता अनंत मोताळे यांनी या समितीची स्थापना केली. आज या समितीत २५ सदस्य आहेत. त्यातील १२/१३ महिला सदस्य आहेत. आपले नित्याचे काम सांभाळून ही मंडळी हे समाजसेवेचे काम करतात. शहरामध्ये एकही व्यक्ती उपाशीपोटी झोपू नये ही अनंत मोताळे यांची आणि त्यांच्यासोबत काम करणाऱ्या सगळ्यांची इच्छा आहे. यातूनच रोटी बँक स्थापन झाली. या रोटी बँकेचे काम मोईद हशर पाहतात. गरजूंपर्यंत अन्न नेऊन पोहचवतात. या सगळ्या कार्यकर्त्यांमुळे वर्षाला वाया जाणारे सरासरी ३० टन अन्न उकिरड्यावर सडण्यापासून वाचले आहे.





## आनंदी पहाट

## आपल्या विचारांमधील उणिवा दूर कराव्यात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दैनंदिन जीवन जगत असताना वर्तमानांत आपण काहीतरी शोधत असतो. हा शोध नेमका कशाचा असतो ह्याचा अंदाज अनेकदा आपल्याला येत नाही. खरं तर हा शोध आनंद प्राप्तीचा असणं आवश्यक असतं. अर्थात, प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असणं स्वाभाविक असतं. आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो? ते अवलंबून असतं. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. आपल्या अंतर्मनांतील विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. ह्या विचारमंथनात आपल्याला वर्तमानातील वास्तवाचं भान राहणं महत्वाचं असतं. पण भूतकाळाच्या साठवणीतील आठवणीत रमलेल्या आपल्या अंतर्मनाला दुसरीकडे भविष्याची काळजी, चिंता करायची देखील सवय जडलेली असते. आजचा दिवस माझा, ह्या भावनेतून, दृष्टीकोनातून आपले विचार, वर्तन, व्यवहार होण्याची जाणीव होत राहणं महत्वाचं ठरतं. अनेकदा तसं आपल्याकडून घडत नाही. आजच्या दिवसातील आनंद लुटायचा सोडून आपण उद्याची विवंचना, चिंता, काळजी, दडपण अशा सर्वच नकारात्मकता निर्माण करणाऱ्या विचारांना कवटाळत बसत असतो. कशाला उद्याची बात? असा ठोस प्रश्न आपण स्वतःला कधी विचारतो का हो? विचारलाच तरीही त्याचं सकारात्मकता निर्माण करणारं उत्तर आपल्याला मिळतं का? हाच खरं कळीचा मुद्दा आहे. ह्याची जाणीव न होणं हीच उणिव म्हणायची का?



आधुनिक केसरी

**इंद्रायणी माता | पान्हा ||**
स्नेहाळ प्रेमाचा | झरा इंद्रायणी ||
सांगे परावाणी | ज्ञानयोगी ||१||
करावे सार्थक | येऊनिया जन्मा
कर्मयोगी आत्मा | ओळखावा ||२||
अंतरीचे रूप |जणोनिया घ्यावे ||
मौनात पाहावे | आत्मारूप ||३||
एकांती रमता | सखी होते गाथा ||
जन्माच्याच व्यथा | दूर होती ||४||
तुझे माझे सारे | जळोनिया जाता ||
इंद्रायणी माता | पान्हा सोडी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


निर्भयं कुरु विश्वं
चस्वच्छमभयदायिने ।
त्रिलोकानां शरण्ये त्वंपाहि नः पाहि
सत्वरम् ।।७।। हे अभयदायिने,
तूतीनही लोकांचे शरण्यस्थान आहेस.
तू हे विश्व स्वच्छ आणि निर्भय कर.
आमचे सत्वर रक्षण कर. रक्षण कर.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !


दुख कारण मन भोग है,
दुख कारण अभिमान ।
दुख कारण गुरु द्वेष है, सद्गुरु नहिं
सनमान ।।४६।। (स्वर्वेद पंचम मण्डल
एकादश अध्याय) ०५/११/४६
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
दु:खाचे कारण मनाचा भोग आहे. मनाच्या विषयोपभोगाद्वारेच जीवनाचे पतन होऊन दु:ख प्राप्त होते. दु:खाचे कारण अभिमान तसेच गुरू-द्रोह आणि सद्गुरूंची अप्रतिष्ठा आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प २४वे

आधुनिक केसरी

आपल्या श्रीगुरूंच्या सेवा कार्यात तत्पर असती
तुकामाई श्रीमहाराजांची सारखी परीक्षा घेती
तुकामाई सांगे ती मेहनत महाराज करिती
गुरुकृपा विनासायास होत ना, याची ही प्रचिती ।।
शेतात जाता जड मोळी उसाची ती उचलली
तुकामाईची आज्ञा क्षणी डोहात बुडी मारली
तुकामाईंनी दिला आवाज ,बाळा, ये बाहेर रे
येता वरती महाराज, गुरूंनी प्रेमे मिठी मारली ।।
सेवावृत्ती श्रीमहाराजांची पाहून गुरू संतोषती
खात्री पटता श्रीगुरूंची शिष्याला पास करिती
आता पावेतो नऊ महिने अवधी गेला होऊनी
गुरू सेवेत श्रीमहाराज मग्न भान हरपोनी ।।
उजाडला रामनवमी" दिन, पावन पर्व आले
वदले गुरू - बाळा,वसिष्ठानी जे रामास दिले,
तेच मी तुजला दिले,हात डोईवरती गुरूंचा
त्या क्षणी "श्रीमहाराज नाम " ब्रह्मचैतन्य जाहले ।।
गुरू-शिष्यांचा मनोसंवाद ही अनुभूती असे
म्हणे कवी अरुणदास, हे सारेच अद्भुत असे ।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## संत हे भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात

आधुनिक केसरी

ज्याला सत्याचे ज्ञान झाले तो सर्वज्ञच बनला; आणि जे या सत्याला धरून राहतात ते संत होत. संत आपल्याला मार्ग दाखवायला तयार असतात, परंतु आपला अभिमान आड येतो, आणि आपण संतांना नावे ठेवतो. एकजण संतांना उद्देशून म्हणाला, तुम्ही आमचे नुकसान करता; अपकार करणाऱ्यावरही उपकार करायला सांगून आम्हांला मेषपात्र करता." वास्तविक, आपल्या संतांनी कर्मांचा ढीग पाडला आहे, पण त्यांच्या आणि आपल्या कर्मांमध्ये फरक आहे. 'राम कर्ता' या भावनेने त्यांनी कर्म केले; आपण 'मी'पणाने करतो, म्हणून कर्म आपल्याला बंधनकारक बनते. संतांची कामगिरी कुणाला दिसत नाही; आणि आमची फक्त दिसण्यापुरतीच असते, त्यामुळे ती पुरी पडत नाही !एखादा पुष्कळ ज्ञानी झाला, पण ते ज्ञान जर वृत्तीत उतरले नाही तर त्याचा काय उपयोग? जगाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जो सुखदुःखाच्या जाळ्यात सापडला नाही त्याच्याकडे जावे. तो साक्षित्वाने राहून जगापासून अलिप्तच



राहतो. कर्म करूनही तो अलिप्त राहतो. आपण मात्र सुखदुःखात गुरफटून जातो. संताचे अंतःकरण शुद्ध असल्यामुळे त्याची शिव्यांची भाषासुद्धा न बोचणारी, किंबहुना आशीर्वादरूपच ठरते. सत्पुरुष काही विद्वान् नसतात. अती विद्वान् मनुष्य कोणी सत्पुरुष झालेला ऐकिवात नाही. कुणी आठव्या वर्षीच घरातून निघून जातो, तर कुणी लग्नातून पळून जातो, तर कुणाला लिहायला-वाचायलाही येत नाही, असे लोक सत्पुरुष झालेले आढळतात. संतांनी देह सोडल्यावर सुद्धा लोकांना त्यांचे अस्तित्व भासते. लहान मूल बाहेर खेळत असते, परंतु मध्येच त्याला आईची आठवण होऊन तिच्याकडे धावते. याचा अर्थ असा की, मुलाला आईचे सूक्ष्म स्मरण सतत असते. तसा भगवंताचा चटका, तशी त्याच्या अस्तित्वाची जाणीव, तशी त्याची निष्ठा, आपल्याजवळ पाहिजे. भगवंताची अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो. त्या स्थितीत त्याला कुणी संत भेटला की तो निवांत होतो. संत हे खरोखर आईसारखे आहेत. ते आपल्याला भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात. सर्व जगावर संतांचे उपकार आहेत. त्यांनी परमात्म्याला सगुणात आणले आणि तो आपल्याला सुसेव्य केला; परमात्म्याला आपलासा करून घ्यायला नामस्मरण हे सोपे साधन दिले; एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी असे सोपे सद्ग्रंथ निर्माण केले; आणि यथाशक्ती अन्नदान करणे हेच कलियुगात उत्तम साधन आहे असे सांगितले. या चार गोष्टी आचरणात आणायचा प्रयत्न ज्याने केला, त्याला काही कमी पडणार नाही; नेहमी समाधानच राहील. **आजचे बोधवचन आहे - जग संतांशिवाय असणे शक्य नाही; आम्हांला त्यांना ओळखता येत नाही. श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

तुका म्हणे भितो पुढिलिया दत्ता । म्हणऊनि चिंता उपजली ॥२॥
मांडवाच्या दारा । पुढें आणिला म्हातारा ॥१॥
म्हणे नवरी आणा रांड । जाळा नवऱ्याचें तोंड ॥ध्रु.॥
समय न कळे । काय उपयोगीं ये वेळे ॥२॥
तुका म्हणे खरा । येथूनिया दूर करा ॥३॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २८ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



# गोरगरीब जनतेला प्रधानमंत्री स्वनिधी योजनेचा लाभ द्यावा

## केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रधानमंत्री स्वनिधी योजनेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला व्यवसायासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासोबतच त्यांची आर्थिक प्रगती व्हावी, यासाठी बँकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी आज केले. संत एकनाथ रंगमदिर येथे पीएम स्वनिधी महोत्सव अंतर्गत लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. कराड बोलत होते. यावेळी एसबीआयचे उप महाप्रबंधक रविकुमार वर्मा, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, रविंद्र निमक, राहुल सुर्यवंशी, उपजिल्हाधिकारी रामेश्वर रोडगे, जिल्हा परिषदेचे अशोक कायंदे, प्रशासन अधिकारी रोहिदास दुरकुलकर आदी उपस्थित होते.

ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेचे आर्थिक समावेशन झाल्यास देशाच्या अर्थकारणाला गती मिळेल असे सांगून डॉ.कराड म्हणाले, प्रधानमंत्री स्वनिधी योजनेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला व्यवसायासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांची आर्थिक प्रगती व्हावी, यासाठी बँकांचा पुढाकार महत्वाचा ठरणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशात विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. बँक खाते नसलेल्यांचे खाते उघडणे, विमा योजनेचा सर्वसामान्यांना लाभ देणे आणि अर्थ सहाय्यापासून वंचित असलेल्यांना ते उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न करण्यात येत असल्याचे कराड म्हणाले.

महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांना केंद्रीय योजनेचा लाभ देण्यासाठी त्यासंबंधीची जागरुकता वाढवण्यासाठी यंत्रणांनी पुढाकार घ्यावा. फेरीवाल्यांचे बँकेत खाते, आधार आणि महानगरपालिकेत नोंदणी असल्यास त्यांना स्वनिधी योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. प्रथम 10 हजार कर्ज वेळेवर परतफेड केल्यास 20 हजार व त्यानंतर 50 हजार कर्ज देण्यात येईल. योजनेतून फळविक्रेते, भजीविक्रेते तसेच फेरीवाले यांच्या कौटुंबिक अर्थव्यवस्थेला हातभार लागणार आहे.

# महाराष्ट्र आयुर्वेद संमेलनाच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. शिवप्रसाद सानप

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** मागील वीस वर्षापासून परभणी जिल्ह्यात आयुर्वेदाच्या प्रचार व प्रसारासाठी दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन महाराष्ट्र प्रांत समितीने परभणी जिल्हाध्यक्षपदी डॉ. शिवप्रसाद दत्तराव सानप यांची फेर निवड केली आहे. शिर्डी येथे हॉटेल जे.सी. कॅस्टलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संपूर्ण परभणी जिल्ह्यात डॉ.शिवप्रसाद सानप यांनी महाराष्ट्र आयुर्वेद संमेलनाचे कार्य यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल त्यांची पुनश्च जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या स्वागत समारंभात डॉ.सानप यांना नियुक्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी डॉ. शरद ठुबे, महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ.सतिश भट्टड, प्रदेश अध्यक्ष डॉ.रामदास आव्हाड, डॉ.अनिल दुबे व डॉ. विश्वंभर पवार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या नियुक्तीचे सर्व श्रेय त्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या सहकार्य केलेल्या सर्व डॉक्टर्स, सर्व पत्रकार बंधू व सर्व स्तरातील लोकांना दिले. या निवडीबद्दल त्यांनी महाराष्ट्र आयुर्वेद संमेलनाचे सर्व पदाधिकारी आणि गुरुवर्य व जिल्हा समितीतील पदाधिकारी व सर्व पत्रकार बंधू यांचे मनापासून हार्दिक आभार मानले.



# गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : सरपंच सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज

**लोणी खुर्द :** वैजापूर तालुक्यातील लोणी खुर्द ग्रंप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाचा एक वर्षाचा कार्याकाळ संपल्यामुळे उप सरपंच गजाला आरिफ सैय्यद यांनी राजीनामा दिला होता. त्यामुळे लोणी खुर्दच्या उपसरपंचपदी राधाकृष्ण सोनवणे यांची निवड करण्यात आली. या आयोजित बैठकीत निवडणुक निर्णय आधिकारी गीता जाधव, ग्रामविकास अधिकारी एस.आर दिवटे, तलाठी राहूल लखवाल यांची नियुक्ती करण्यात आली होती.निवडणूकीसाठी नऊ सदस्या पैकी राधाकृष्ण सोनवणे व राजेंद्र जगदाळे या दोन उमेदवारांनी उपसरपंच नामनिर्देशन पत्र दाखल केल्यानंतर गुप्त मतदान घेण्यात आले आसता सोनवणे यांना पाच तर जगदाळे यांना चार मते पडली त्यामुळे



निवडणुक निर्णय आधिकारी यानी राधाकृष्ण सोनवणे यांना विजयी घोशीत केले. यावेळी बोलतांना राधाकृष्ण सोनवणे म्हणाले आम्ही लोणी खुर्द गावातील मूलभूत गरजा ओळखून त्या पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत हा महत्वाचा घटक असल्यामुळे ग्रामविकास साधण्यासाठी ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहु ग्रामविकासाच्या अनेक योजना ह्या पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतव्दारे राबवून . गावाच्याविकासासाठी, कर्तव्याची जाणीव ठेवून काम करु.विविध योजनेच्या माध्यमातून गावांचा कायापालट होऊ शकतो. तेव्हा या योजनेच्या अंमलबजावणीसाठी पदाधिकारी व संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी समन्वय ठेवण्याची गरजआहे.


आपल्या गावात स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते, शुध्द पाणी पुरवठा यासाठी गावची ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे. आपल्या लोणीगावाच्याविकासासाठी निधीची कमतरता भासणार नाही यादृष्टीने तरतूद करुन . गावाचा विकास आराखडा तयार करुन, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायतव्दारे प्रभावीपणे राबवून लोकांना रोजगार मिळेल आणि रस्ते, वृक्ष लागवड, शेततळे, नाला सरळीकरण, यासारख्या योजनांव्दारे गावाचा विकास साधला जाईल आह्या प्रकारे आपण सर्वांनी विचार केला तर लोणी खुर्द गावाचासर्वांगीणव्हायला वेळ लागणार नाही . गरज आहे ती आपल्या समस्या काय आहेत हे जाणून घ्यायची आणि त्या दृष्टीने एक एक पाहुल टाकत लोणी खुर्द गावाला आदर्शगावाच्यापंगतीत नेहून ठेवण्याची . याला आपण सर्वजन जबाबदार आहोत आणि आपले सर्वांचे हे प्राथमिक कर्तव्य आहे.

शासकीय योजनांचा फायदा लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी स्वावलंबी, स्वयंपूर्ण, समृद्ध असे गाव शासनाच्या मदतीने कशाप्रकारे तयार करू शकतो ही विचारधारा तयार करणे आवश्यक आहे. आणि हे काम गावतील नागरीकांच्या मदतीने आपण स्वयंसेवक समजुन आपण सर्वांनी चाम करू आशी भावना उप सरपंच राधाकृष्ण सोनवणे यांनी आधुनिक केसरीशी मराठीशी बोलतांना व्यक्त केली. सोनवणे यांची पत्रकारीता. राजकीय. सामाजिक. शैक्षणिक. आध्यात्मिक सांस्कृतिक श्रेत्रातील मान्यवरांसह सर्वच स्तरातून आभिनंदन करण्यात येत आहे.

# सुदानमध्ये अडकलेल्या सांगलीकरांसाठी जयंत पाटील सरसावले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सुदानमध्ये अडकलेल्या सांगली जिल्ह्यातील सुमारे शंभर नागरीकांच्या सुटकेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील सरसावले असून या नागरिकांना परत आणण्यासाठी लक्ष देऊन योग्य पावले उचलण्याची मागणी परराष्ट्र मंत्र्यांकडे ट्वीटद्वारे केली आहे.



सुदानमध्ये सुरु असलेल्या देशातंर्गत यादवी युध्दामुळे सांगली जिल्ह्यातील सुमारे शंभर नागरीक अडकले आहेत. भारतीय दूतावासाने अडकलेल्या नागरिकांना मायदेशी आणण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणापासून सुमारे १२०० किलोमीटरवर हे नागरीक आहेत. परराष्ट्र खात्याकडून ऑपरेशन कावेरीअंतर्गत भारतीय नागरिकांना मायदेशी आणले जात आहे. आतापर्यंत काही भारतीयांना मायदेशी आणण्यात आले आहे, असेही जयंत पाटील यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.




# माजी खासदाराची सुटका

आधुनिक केसरी

बिहारचे माजी खासदार आनंद मोहन सिंहची गुरुवारी पहाटे 4:30 वाजता तुरुंगातून सुटका करण्यात आली. तुरुंगाचे नियम बदलून गुंड प्रवृत्तीतून राजकारणी झालेल्या आनंद मोहन सिंहच्या सुटकेचा मार्ग मोकळा केल्याबद्दल आता बिहार सरकारला टीकेचा सामना करावा लागत आहे. आनंद मोहन सिंह हा आयएएस अधिकारी आणि तत्कालीन जिल्हा दंडाधिकारी जी. कृष्णैय्या यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. आनंद मोहन सिंहने चिथावणी दिलेल्या जमावाने 1994 साली आयएएस जी. कृष्णैय्या यांची हत्या केली होती. त्यांना त्यांच्या गाडीतून बाहेर ओढून बेदम मारहाण केल्यानंतर त्यांची गोळ्या झाडून हत्या केली होती. 1985 बॅचचे आयएएस अधिकारी जी. कृष्णैय्या हे तेलंगणातील महबूबनगरचे रहिवासी होते. या प्रकरणात आनंद मोहनला 2007 मध्ये कनिष्ठ न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली होती. एका वर्षानंतर म्हणजेच, 2008 मध्ये पाटणा उच्च न्यायालयाने ही शिक्षा जन्मठेपेत बदलली. बिहार सरकारने नुकतेच अटकेत असलेल्या कैद्यांच्या सुटकेचे नियम बदलले आणि मोठ्या गुन्ह्यांतील 27 कैद्यांच्या सुटकेची अधिसूचना जारी केली होती. बिहार सरकारच्या निर्णयानंतर माजी खासदार आनंद मोहन सिंह याची तुरुंगातून सुटका झाली. IAS च्या हत्येतील दोषी आनंद मोहन सिंह हा मागील 15 वर्षांपासून तुरुंगात होता. आनंद मोहन याने शिक्षेच्या निकालाला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले होते, मात्र आजपर्यंत कोणताही दिलासा न मिळाल्याने तो सहरसा तुरुंगात शिक्षा भोगत होता. त्याची पत्नी लवली आनंद याही लोकसभा खासदार राहिल्या आहेत, तर त्याचा मुलगा चेतन आनंद बिहारमधील शिवहारमधून आरजेडीचा आमदार आहेत. आनंद मोहनच्या सुटकेवर झालेल्या गदारोळाला उत्तर देताना त्याने भाजपवर टीकास्त्र सोडले. "गुजरातमधील बिल्किस बानो प्रकरणातील काही दोषींची सुटका झाली आहे. तेही नितीश-आरजेडीच्या दबावामुळेच का? असा मिश्कील सवाल आनंद मोहन सिंहने केला. आनंद मोहन सिंह त्याचा मुलगा, आमदार चेतन आनंदच्या लग्न समारंभात सहभागी होण्यासाठी 15 दिवसांच्या पॅरोलवर बाहेर होता. पॅरोलची मुदत संपल्यानंतर तो 26 एप्रिलला सहरसा कारागृहात परतला होता आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे 27 एप्रिलला त्याची सुटका झाली.

# चीन ईशान्येत सतत दबाव का वाढवत आहे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी


**एकेकाळी अशांत, अस्थिर आणि विकासाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असलेल्या ईशान्य भारतामध्ये आज विकासाचे पर्व सुरू झाले आहे. पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि उद्योगांसह बंडखोरांनी शस्त्रे खाली ठेवण्यास प्रारंभ केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ईशान्य भारत म्हणजे देशाची अष्टलक्ष्मी हे विधान म्हणूनच आता सत्यात उतरण्यास प्रारंभ झाला आहे. ईशान्य भारताचे भूराजकीय स्थान अतिशय महत्वाचे आहे. या प्रदेशावर चीनचे नेहमीच लक्ष असते, अरूणाचल प्रदेश तर आमचाच भाग आहे हे पालूपदही चीनकडून नेहमीच लावले जाते.**

या प्रदेशामध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांनीही दीर्घकाळ राहून भारतविरोध जोपासण्याचे काम केले आहे. त्यामुळे, ईशान्य भारतातील बंडखोरी कमी होण्याऐवजी वाढली. अर्थात, २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर परिस्थिती बदलण्यास प्रारंभ झाला. स्वातंत्र्यानंतर दीर्घकाळ उपेक्षा आणि राजकारणाचा बळी ठरलेल्या ईशान्येकडील राज्यांमध्ये विकासाची गती थांबली होती. त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे आणि नव्या भारताच्या विकासाच्या प्रवासात त्यांना भागीदार बनविण्याचे आव्हान होते.

त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्ट ईस्ट' हे धोरण आखले आणि ईशान्य भारतास राष्ट्रीय धोरणाच्या केंद्रस्थानी आणले. या धोरणामुळे २०१४ सालापासून ईशान्य भारतामध्ये शांतता प्रस्थापित होण्यास प्रारंभ झाला. आजची स्थिती पाहिल्यास फुटीरतावादी मुख्य प्रवाहात सामील होत आहेत, राज्यांमधील सीमावाद मिटवले जात आहेत, वंशिक संघर्ष कमी होत आहेत आणि विकासाचे नवीन आयाम तयार होत आहेत. यामुळे ईशान्य भारत विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यास प्रारंभ झाला आहे. दोन वर्षांपूर्वी गलवान खोऱ्यात झालेल्या हिंसक संघर्षानंतर चीनने ईशान्येकडील अरुणाचल प्रदेशासह तिबेट सीमेवर लक्ष केंद्रित करून सीमावर्ती भागात आपल्या कारवाया तीव्र केल्या आहेत. यापूर्वी चीनकडून सीमाभागातील रस्ते, रेल्वे मार्ग, गावे आणि इतर पायाभूत सुविधांशी संबंधित मोठ्या प्रकल्पांच्या बातम्या अनेकदा समोर आल्या आहेत. अलीकडच्या काळात या सीमेवर अशा प्रकारच्या हिंसक संघर्षाची ही पहिलीच घटना आहे .यापूर्वी तवांग सेक्टरमध्ये चिनी लष्कराचे सुमारे दोनशे सैनिक भारतीय हद्दीत घुसले होते. तिथल्या भारतीय जवानांशी त्यांची बाचाबाचीही झाली. नंतर स्थानिक कमांडरच्या पातळीवर प्रकरण मिटवण्यात आले आणि चिनी जवानांना परत पाठवण्यात आले. चीनने सीमेपासून २० किलोमीटरच्या परिघात मोठ्या प्रमाणावर बांधकाम केले आहे. तिबेटची राजधानी ल्हासा येथून जवळच्या सीमेपर्यंत नवीन हाय-स्पीड ट्रेनही सुरू झाली आहे. अलीकडेच अशा बातम्याही समोर आल्या होत्या की, चीन भारतीय सीमेतील एका गावात स्थायिक झाला आहे. सॅटेलाइट फोटोंद्वारे याची पुष्टी झाली आहे. या भागात चिनी लष्कराच्या वाढत्या कारवायांमुळे स्थानिक लोक चिंतेत आहेत. ते म्हणतात की चीनकडून नियंत्रण रेषेजवळ वेगाने रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांच्या बांधकामाची कामे चिंताजनक आहेत.

नियंत्रण रेषेजवळ भारत-अमेरिकेच्या लष्करी सरावावर चीनने आक्षेप घेतला होता. त्याच बरोबर अरुणाचल प्रदेशच्या सीमावर्ती भागात राहणाऱ्या भारतीय तरुणांना चिनी सैन्यात भरती करण्याचा प्रयत्न करत असल्याच्या बातम्याही आल्या होत्या. त्यानंतर मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी सीमाभागातील पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या कामाला गती देण्याची विनंती केंद्राला केली होती जेणेकरून बेरोजगारी आणि कनेक्टिव्हिटीसारख्या समस्यांना आळा बसेल.

चीन गेल्या काही वर्षांपासून सीमेवर सातत्याने पायाभूत सुविधा मजबूत करत आहे. सीमेच्या २० किलोमीटर परिसरात त्यांनी मोठ्या प्रमाणावर बांधकामे केली आहेत. हवाई, रेल्वे आणि रस्त्यांचे जाळे विस्तारण्याबरोबरच त्यांनी तिबेटमध्ये बुलेट ट्रेनही सुरू केली आहे. ही ट्रेन अरुणाचल प्रदेशातील निंगची या सीमावर्ती शहरात




जाते. वास्तविक नियंत्रण रेषेवरील ३,४८८ किमी लांबीच्या क्षेत्रावर भारत आणि चीन यांच्यात सीमा विवाद आहे. अरुणाचलचे स्थानिक नेते सातत्याने चीनवर नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत घुसल्याचा आरोप करत आहेत. यापूर्वी चिनी सैन्याने पाच भारतीय तरुणांचे अपहरणही केले होते. १२ दिवसांच्या राजनैतिक पातळीवरील चर्चेनंतर त्यांची सुटका करण्यात आली. सरकारी अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, गेल्या वर्षभरात चिनी सैनिकांनी सीमा ओलांडल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. परंतु तो भाग इतका दुर्गम आहे की सर्वत्र सैन्य तैनात करणे शक्य नाही आणि माहितीही उशिराने राजधानीपर्यंत पोहोचते. शेवटी अरुणाचल प्रदेशात आणि विशेषतः तवांग भागात चीनच्या वाढत्या कारवाया कशामुळे ? चीन संपूर्ण अरुणाचल हा दक्षिण तिबेटचा भाग मानत असला तरी तवांगला सामरिक महत्त्व आहे.

तवांग हा अरुणाचल प्रदेशातील सर्वात पश्चिमेकडील जिल्हा आहे, जो राजधानी इटानगरपासून सुमारे ४५० किमी अंतरावर आहे. तिबेट आणि भूतानशी तिची सीमा आहे. तवांगमध्ये तिबेटची राजधानी ल्हासा नंतर जगातील दुसरा सर्वात मोठा तिबेटीयन बौद्ध मठ आहे. तिबेटी बौद्ध केंद्राचे हे शेवटचे सर्वात मोठे केंद्र चीनला अनेक दिवसांपासून नष्ट करायचे होते. १९६२ च्या भारत-चीन युद्धादरम्यान तवांग हे लढाईचे केंद्र होते. माजी परराष्ट्र सचिव शिवशंकर मेनन यांनी त्यांच्या 'चॉईसेस इनसाइड द मेकिंग ऑफ इंडियाज फॉरेन पॉलिसी' या पुस्तकात सांगितले आहे की, बीजिंगने हे स्पष्ट केले आहे की त्यांना तवांग हवे आहे. मात्र, बीजिंगच्या या मागणीला भारत सरकार सातत्याने विरोध करत आहे. वास्तविक, १९१२पर्यंत तिबेट आणि भारत यांच्यात कोणतीही स्पष्ट सीमारेषा आखलेली नव्हती. या भागांवर मुघल किंवा ब्रिटिश शासकांचे नियंत्रण नव्हते. तवांगमध्ये बौद्ध मंदिर सापडल्यानंतर सीमारेषेचे मूल्यांकन सुरू झाले.

अरुणाचल प्रदेशचे भाजप खासदार तापीर गाओ यांनी असा युक्तिवाद केला की ही समस्या केंद्रातील माजी काँग्रेस सरकारची निर्मिती आहे. ऐंशीच्या दशकापासून चीन सीमावर्ती भागात रस्ते बांधत आहे. राजीव गांधी सरकारच्या कार्यकाळात तवांगमधील सुमदोरोंग चू खोऱ्यावर चीनने ताबा मिळवला होता. हद्दीपर्यंत रस्त्याच्या बांधकामाकडे शासनाने लक्ष दिले नाही. परिणामी, तीन ते चार किलोमीटरचा भाग बफर झोन बनला, जो नंतर चीनच्या ताब्यात गेला.

या भागात, जिथे भारत मॅकमोहन रेषेला सीमा मानतो, तिथे चीन वास्तविक नियंत्रण रेषा (LAC) मानतो. भाजप खासदार गाओ म्हणतात, या समस्येवर एकमेव आणि कायमस्वरूपी उपाय म्हणजे राज्याची सीमा अचूकपणे चिन्हांकित करणे." धोरणात्मक तज्ज्ञ जीवन दासगुप्ता म्हणतात, "केंद्र सरकारने ही समस्या गांभीर्याने घेतली पाहिजे आणि त्याच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी ठोस पुढाकार घ्यावा जेणेकरून चीनच्या योजनांना वेळेत सामोरे जावे लागेल. यासोबतच सीमाभागात विकास आणि पायाभूत सुविधांचे प्रकल्पही लवकर राबविण्याची गरज आहे. सीमेवर चीनच्या वाढत्या सक्रियतेला तोंड देण्यासाठी भारत सरकार अरुणाचल प्रदेशातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यात व्यस्त आहे. यामध्ये नवीन रस्ते, पूल, हेलिकॉप्टर तळ आणि दारुगोळ्यासाठी भूमिगत साठवण तळ बांधणे, सीमावर्ती भागात सर्व हवामान प्रवेश प्रदान करणारे नवीन बोगदे यांचा समावेश आहे.या भागातील मुलभूत प्रकल्पांसाठी शासनाने यावर्षी २४९.१२ कोटींची तरतूद केली आहे, तर मागील वर्षी ही रक्कम केवळ ४२.८७ कोटी होती.

चीनच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी सीमा भागात तैनात लष्कराच्या जवानांची संख्या वाढवण्याबरोबरच बोफोर्ससारख्या आधुनिक तोफगोळ्याही तैनात करण्यात आल्या आहेत. यासह, अत्यंत महत्त्वाचा ७०० कोटी रुपयांचा सेला बोगदा प्रकल्प पुढील वर्षीच्या प्रस्तावित मुदतीपूर्वी जूनमध्येच पूर्ण होणार आहे. त्यामुळे तवांग आणि त्याच्या लगतच्या सीमाभागात वर्षाचे बारा महिने अनिर्बंध वाहतूक शक्य होणार आहे. सध्या सेला पास हिवाळ्यात जोरदार बर्फवृष्टी आणि खराब हवामानामुळे बंद आहे.त्यामुळे सीमावर्ती भागात लष्करी उपकरणे पोहोचवण्यासाठी लागणारा वेळ वाचेल. पारंपारिकपणे, लडाखमधील ८३२ किमी लांबीच्या LAC चे निरीक्षण १४ व्या कॉर्प्सच्या एका विभागाद्वारे केले जाते. परंतु पूर्व कमांडमधील १,३४६ किमी लांबीच्या एलएसीच्या संरक्षणाची जबाबदारी या प्रदेशातील दोन कॉर्प्सच्या सहा विभागांवर सोपवण्यात आली आहे.

यासोबतच, चिनी कारवायांचा सामना करण्यासाठी, भारतीय सैन्य तिबेटोलॉजीमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (LAC) तैनात असलेल्या आपल्या सैनिकांना आणि अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देत आहे जेणेकरून त्यांना तिबेटी संस्कृती, लोक, राहणीमान आणि समाजाची अधिक चांगली माहिती मिळू शकेल. यासाठी देशभरातील सात संस्थांची निवड करण्यात आली आहे. यातील एक सिक्कीम आणि दुसरा अरुणाचल प्रदेशात आहे. ही दोन्ही राज्ये तिबेटच्या सीमेला लागून आहेत. सीमेच्या दोन्ही बाजूला तिबेटी लोकसंख्या मोठी आहे.

# वाहन चालवताना मोबाईलवर बोलू नये !



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

आधुनिक केसरी

**आज घराबाहेर पडल्यानंतर प्रत्येकाने स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.आज कुठेही जायचे म्हटले की वाहनांशिवाय पर्यायच राहीला नाही.दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत चालली आहे.आपल्या जीवनात वेळ खुप मौल्यवान आहे.आज बहुतांश वेळा माणसे वाहन चालवताना मोबाईलवर बोलताना दिसुन येतात.एखादा फोन आला की लगेच वाहन चालवताना मोबाईलवर बोलतात. खरोखर हे धोकादायक ठरू शकते.असेच म्हणावे लागेल.**

सुरक्षित प्रवास करा, सुरक्षित पोहचा, या सुत्रांच्या अवलंब आपण प्रत्येकाने केला पाहिजे. आपल्या घरी आपले कुटुंब, नातेवाईक वाट पाहत असतात. जीवन हे अनमोल आहे. आयुष्य हे एकदाच आहे. हे विसरता कामा नये. बऱ्याचदा वाहन चालवताना अचानक मोबाईलवर फोन येतो आणि माणूस गडबडुन फोन घेण्याचा प्रयत्न करतो. तसाच कानाला मोबाईल लावत फोनवर बोलत वाहन चालवतो. अनेकदा मोबाईलवर बोलण्याचा नादात वाहनांवर चे नियंत्रण सुटते. अशाच हलगर्जीपणामुळे अपघातांच्या संख्येत वाढ होत आहे. मोबाईल वर बोलण्याच्या ओघात अनेक अपघाताला निमंत्रण मिळत आहे. ही वस्तुस्थिती आहे. आपल्या जीवापेक्षा मोबाईल फोन मोठा नाही. फोनवर अवश्य बोला पण वाहन एका बाजुला घेऊन बोला. आतातर अनेक जण कारवाई टाळावी म्हणुन इअर फोन, ब्लुटुथचा वापर करु लागली आहे. आपण कोणतेही डिव्हाईस वापरले तरी लक्ष विचलित व्हायचे ते थांबणार आहे का.नाही मुळीच नाही. अलिकडच्या काळात वाहन चालवताना स्मार्टफोन वर गाणी लावुन हेडफोन लावून वाहन चालविण्याची जणु फॅशनच झाली आहे. परंतु ही फॅशन खुप महागात पडत आहे. पोलीस वारंवार सुचना देऊनही दुचाकी, चारचाकी वाहन चालवताना मोबाईलवर बोलण्याचे प्रमाण वाढले आहे.आणि हाच हलगर्जीपणा अपघाताला निमंत्रण देत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार मोबाईलवर बोलताना वाहन चालविल्यास अपघाताची शक्यता चौपटीने वाढते. त्याचबरोबर रस्त्यावर चालत असल्यास,रस्ता ओलांडताना देखिल मोबाईलवर बोलण्याचे टाळले पाहिजे. मोबाईवलर जरूर बोला पण काळजी घ्या. आपल्या परीवाराचा विचार करा. अति घाई संकटात जाई या म्हणीप्रमाणे घाई करता कामा नये. घाई केल्यास अनर्थ घडतो. हे निश्चित आहे. तेव्हा वाहन चालवताना मोबाईलवर बोलू नये ही काळजी घेतली पाहिजे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मुलीवर अत्याचार करणाऱ्यावर कारवाई करा

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची उपमुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पेठ तालुक्यातील भुवन येथील शासकीय



माध्यमिक आश्रमशाळेत अधीक्षक राहुल सुरेश तायडे याने सातवीतील मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, आठ दिवसांनी बहिणीवर अत्याचार झाल्याचे भावाला समजले. तोपर्यंत आश्रमशाळेच्या अधिक्षीका, मुख्याध्यापक व पोलिसांनी कोणतीही दखल घेतली नाही. १५ दिवस होवूनही तिची वैद्यकीय चाचणी करण्यात आली नसल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी आरोपी व सहआरोपींवर सक्त कारवाई करावी, अशी मागणी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे.

भुवन (ता.पेठ, जि.नाशिक) येथील आदिवासी आश्रम शाळेत ९ एप्रिल २०२३ रोजी सातवीमध्ये शिकणाऱ्या मुलीवर वसतिगृहाच्या कर्मचाऱ्याने अत्याचार केल्याचा पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी व सहआरोपीवर सक्त कारवाई करावी. त्यांना जामीन मिळणार नाही, यासाठी चांगले विधीज्ञ देण्यात यावे. वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यांकडे तपासाचे काम सोपवण्यात यावे. पीडितचे मानसिक समुपदेशन करण्यात करून तिला मनोधेर्य योजनेतून तात्काळ मदत करावी. पीडित मुलीस अन्य शासकीय आदिवासी आश्रमशाळेत स्थलांतरीत करावे. तक्रार घेण्यास विलंब करणाऱ्या, पीडित मुलीचे जबाब बदलणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी. आरोपी कर्मचारी व त्यास मदत करणारे आश्रमशाळेतील कर्मचारी व मुख्याध्यापक यांना सेवेतून बडतर्फ करावे. घटना घडून 8 दिवस होईपर्यंत तिच्या पालकांना अवगत न करणाऱ्या व प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या शाळेतील अन्य कर्मचारी शिक्षक, मुख्याध्यापक, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनाही प्रकरणात सहआरोपी करावे. पीडित मुलीचा उच्चशिक्षण होईपर्यंतच्या सर्व खर्चाची तरतूद शासनाने विशेष बाब म्हणून करावी. कारण शासनाच्या परिरक्षणात असलेल्या अल्पवयीन पीडितेचे संरक्षण करण्यास शासकीय यंत्रणा असमर्थ ठरली आहे. या आश्रम शाळेत मागील वर्षभरात कोण-कोणत्या अधिकाऱ्यांनी भेटी व आश्रम शाळेच्या केंद्र तपासण्या केल्या व त्यांच्या तपासणीची गुणवत्ता तपासण्यात यावी. राज्य शासनाच्या सर्व आदिवासी, सामाजिक न्याय, उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण व शासनाच्या अनुदानातून चालवण्यात येणाऱ्या सर्व महिला व मुलींच्या वसततिगृहात असे प्रकार होणार नाहीत, यासाठी प्रतिबंधात्मक योजना आखाव्यात. प्रत्येक पोलीस ठाणेअंतर्गत असलेल्या अशा सर्व वसतिगृहांना त्या-त्या पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्येक 15 दिवसांतून एकदा भेट देऊन तेथील विद्यार्थीनींसोबत संवाद साधावा. याबाबतच्या भेटीचा अहवाल राज्यस्तरावर संकलित करण्यात यावा. मुली व महिलांच्या वाहतूक करणाऱ्या स्कूल बसेस रिक्षा व इतर वाहने यांच्या वाहन चालकाची वार्षिक चारित्र्य पडताळणी पोलीस ठाणेमार्फत करण्यात यावी. या वसतीगृहामध्ये व खासगी व्यक्तीमार्फत चालविण्यात येणाऱ्या मुली व महिलांच्या सर्व वसतिगृहांचाही समावेश करावा, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनाच्या प्रती पोलीस महासंचालक, जिल्हाधिकारी, महिला व बालविकास आयुक्त, पुणे, आदिवासी विकास आयुक्त, नाशिक, परिवहन आयुक्त यांना देण्यात आल्या आहेत.

**मुलीला न्याय देण्याचे निर्देश :** पीडित मुलीने न्यायालयासमोर जबाब सुरु असताना बलात्कार केल्याचे सांगितले आहे . पेठ पोलीस ठाण्यातील पोलिसांनी संवेदनशीलपणे तक्रार नोंदवली नाही . पोलिसांनी तिला घाबरविले आहे . पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांच्याशी बोलणे झाले असून, या प्रकरणाची चौकशी करावी, असे सांगितले आहे . ज्या पोलिसांनी हलगर्जीपणा केला, त्याच्यांवर कारवाई करावी . पीडित मुलीला दुसऱ्या आदिवसी आश्रमशाळेत स्थलांतरीत करावे . मनोधैर्य योजनेतून मदत मिळावी . आरोपीस जामीन मिळाला असला तरी पोलिसांनी जामीन रद्दसाठी प्रयत्न करावेत . याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांना निवेदन दिले आहे . या प्रकरणात दररोज पीडित मुलीच्या नातेवाईकांशी संपर्क असून, मुलीला न्याय मिळावा, यासाठी संबंधितांना निर्देश दिले आहेत . **डॉ . नीलम गोऱ्हे, उपसभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र**

# पुणे- मुंबई द्रुतगतीमार्गावर विचित्र अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पुणे- मुंबई द्रुतगतीमार्गावर वाहने एकमेकांना धडकून विचित्र अपघात झाला असून काही जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. दुपारी एकच्या सुमारास खोपोली एक्झिट येथे हा अपघात झाला. सुदैवाने या अपघातात जीविहितहानी झालेली नाही. या अपघातामुळे मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली होती.या अपघातात वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव ट्रकच्या चालकाचे नियंत्रण सुटून किंवा ब्रेक निकामी झाले, त्यानंतर या ट्रकची वाहनांना धडक बसली असावी असाही एक प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. बोरघाटात तीव्र उतारावर ही घटना घडली आहे. अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांना खोपोली येथील रुग्णालयात घेऊन जाण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, अपघातग्रस्त सामाजिक संस्था घटनस्थळी पोहचल्या.

# आयुर्वेद-ॲलोपॅथी डॉक्टरांचे काम भिन्न

## समान वेतनाचा आदेश रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** शासकीय रुग्णालयांमध्ये काम करणारे आयुर्वेद डॉक्टर हे ॲलोपॅथी डॉक्टरांच्या समकक्ष नसल्याचे स्पष्ट करत दोघांना समान वेतन लागू करण्याचा गुजरात उच्च न्यायालयाचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी रद्दबातल केला. ॲलोपॅथी डॉक्टरांप्रमाणे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन सेवा आयुर्वेदाच्या डॉक्टरांना द्याव्या लागत नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

आयुर्वेद व्यावसायिक हे एमबीबीएस पदवीधारक डॉक्टरांच्या समकक्ष मानले जाण्यास पात्र आहेत, असा आदेश गुजरात उच्च न्यायालयाने २०१२ मध्ये दिला होता. त्यास आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणीअंती सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी निकाल दिला. आयुर्वेद व्यावसायिकांचे महत्त्व आणि पर्यायी किंवा स्वदेशी औषध पद्धतीला प्रोत्साहन देणे महत्त्वाचे असले तरी दोन्ही श्रेणींतील डॉक्टर समान वेतनास पात्र ठरण्यासाठी सारखे काम नक्कीच करत नाहीत, या वस्तुस्थितीकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही, याचा उल्लेख न्यायालयाने केला. 'दोन्ही पद्धती ज्या उपचार विज्ञानाचा अवलंब करतात त्यांच्या स्वरूपामुळे आणि आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ॲलोपॅथी डॉक्टर आकस्मिक कामे करण्यास सक्षम आहेत. त्यांनाच गंभीर जखमींवर तातडीचे उपचार करावे लागतात. ते आयुर्वेदिक डॉक्टर करू शकत नाहीत', असे असे न्या. व्ही. रामसुब्रमण्यम व न्या. पंकज मित्तल यांच्या खंडपीठाने नमूद केले. एमबीबीएस पदवीधारक डॉक्टर हे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणाऱ्या शल्यविशारदांना (सर्जन) जशी मदत करू शकतात, तसे करणे आयुर्वेदिक डॉक्टरांना शक्य नाही, याचाही खंडपीठाने उल्लेख केला.

शहरांमधील सामान्य रुग्णालयांमध्ये बाह्यरुग्ण विभागात ॲलोपथीच्या डॉक्टरांना दिवसाला शेकडो रुग्णांवर उपचार करावे लागतात, तसे आयुर्वेद व्यावसायिकांना करावे लागत नाहीत, असेही खंडपीठाने म्हटले आहे.आयुर्वेद आणि पर्यायी किंवा स्वदेशी औषध पद्धतीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे,हे मान्य. मात्र, दोन्ही श्रेणींतील डॉक्टर एकसारख्या वेतनास पात्र ठरविण्यासाठी समान पद्धतीचे काम करत नाहीत, या वस्तुस्थितीकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही.



बद्रिनाथ मंदिराचे गुरुवारी दरवाजे उघडल्यानंतर चारधाम यात्रेला सुरुवात झाली असून मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले आहे. दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली आहे.

# रेशन कार्डच्या विविध समस्यांचे होणार निवारण : सातपुते

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** तालुक्यातील पिलीवसह चांदापुरी, पठाण वस्ती, कुसमोड, झिंजेवस्ती, सुळेवाडी, काळमवाडी, बचेरी, शिंगोर्णी आदी गावातील अनेक लोकांच्या रेशन कार्ड बाबत विविध समस्या आहेत.सदर समस्यांचे अनेक दिवसांपासून निवारण न झाल्या अनेक लोक स्वस्त धान्य दुकानातून मिळत असलेल्या अन्नधान्यापासून वंचित असल्याचे पहावयास मिळत असल्याचे लक्षात येताच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुका उपाध्यक्ष रणजीत सातपुते यांनी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून शनिवार दिनांक 29 एप्रिल 2023 रोजी माळशिरस तालुक्याचे प्रभारी तहसीलदार तुषार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जीर्ण झालेले रेशन कार्ड नवीन करून देणे,रेशन कार्ड मध्ये नवीन नाव समाविष्ट करणे,रेशन कार्ड मधील नाव रद्द करणे,किंवा नावात बदल करणे यांसह विविध समस्यांचे निवारण करण्यासाठी पिलीव येथील श्री स्वामी समर्थ हॉटेलच्या पाठीमागे आर्वे कॉम्प्लेक्समध्ये प्रज्ञा ई - सेवा केंद्र येथे रेशन कार्ड समस्यांचे निवारण या शिबिराचेआयोजन केले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# चित्रकला व्यासंगाला प्रोत्साहन !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले. अमेरिकेच्या सरकारने या शोधाचे हक्क विकत घेण्यास नकार दिल्यावर मॉर्स यांनी स्वतःची कंपनी स्थापन केली. तारायंत्राचा प्रसार लवकरच झपाट्याने वाढला व बहुतेक देशांनी त्याचा वापर करण्यास सुरुवात केली.**

तथापि लगेचच मॉर्स यांच्यावर त्यांचे भागीदार व प्रतिस्पर्धी संशोधक यांनी शोधाच्या अधिकाराबाबत दावे लावले. अतिशय खर्चिक न्यायालयीन खटल्यांचा दीर्घ मालिकेनंतर इ.स.१८५४ साली अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मॉर्स यांचा एकस्व अधिकार मान्य केला. अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले.

मॉर्स- मोर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीझ हे अमेरिकन चित्रकार व विद्युत चुंबकीय तारायंत्राचे जनक होत. मॉर्स यांचा जन्म दि.२७ एप्रिल १७७१ रोजी चार्ल्सटाऊन- मॅसॅचूसेट्स येथे झाला. त्यांचे शिक्षण अँडोव्हर येथील फिलिप्स ॲकॅडमीत व पुढे येल कॉलेज येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्याकाळी फारसे आकलन न झालेल्या विद्युत या विषयावरील व्याख्यानामुळे त्यांना गोडी निर्माण झाली. त्याच वेळी त्यांना लघू व्यक्तिचित्रे काढण्याचा छंद जडला. तथापि त्यांच्या वडिलांना त्यांचा हा छंद पसंत नव्हता. सन १८१०मध्ये पदवी संपादन केल्यावर त्यांनी बॉस्टन येथील एका ग्रंथ प्रकाशकाकडे कारकुनाची नोकरी पत्करली. त्या काळचे प्रख्यात अमेरिकन चित्रकार वॉशिंग्टन ऑल्स्टन व गिल्बर्ट स्टूअर्ट यांनी मॉर्स यांच्या चित्रकलेच्या व्यासंगाला प्रोत्साहन दिले. सन १८११ साली ऑल्स्टन यांचे विद्यार्थी म्हणून ते इंग्लंडला चित्रकलेच्या अभ्यासासाठी गेले. तेथील त्या कलेच्या वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक शैलीचा- दंतकथा व ऐतिहासिक घटना यांच्या अद्भुत चित्रणाचा त्यांनी स्वीकार केला. तथापि १८१५ मध्ये ते अमेरिकेला परतले तेव्हा अमेरिकन लोकांना त्यांच्या ऐतिहासिक चित्रांत रस नाही, असे त्यांना दिसून आले. त्यामुळे नाइलाजाने त्यांना अर्थार्जनासाठी व्यक्तिचित्रे रंगविण्याचा व्यवसाय पुन्हा पत्करावा लागला. त्यांनी न्यू इंग्लंड, न्यूयॉर्क व द.कॅरोलायना या राज्यांत 'फिरते चित्रकार' म्हणून सुरुवात केली. इ.स. १८२५नंतर न्यूयॉर्क शहरात स्थायिक झाल्यावर त्यांनी काही अप्रतिम व्यक्तिचित्रे रंगवली. त्यांतील मार्क्विस दी लाफायेत यांची दोन व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत.

इ.स.१८१७मध्ये त्यांनी आपले धाकटे बंधू सिडनी एडवर्ड्स मॉर्स यांच्या समवेत पंपासंबंधीची तीन एकस्वे- पेटंटे मिळविली होती. संगमरवरावर कोरीव काम करण्याचे एक यंत्र त्यांनी सन १८२३मध्ये विकसित केले. त्यानंतर विद्युत विषयक प्रयोगांत त्यांनी सातत्याने विशेष रस घेतला. सन



१८३२मध्ये फ्रान्सहून जहाजातून परत येतानाच्या प्रवासात चार्लस टी.जॅक्सन यांनी मॉर्स यांना लांब अंतरावर विद्युत प्रेषण करणारे व फ्रान्समध्ये मिळवलेले एक उपकरण दाखविले. यामुळे मॉर्स यांना विद्युत व तारायंत्र या विषयांत अधिक स्वारस्य निर्माण झाले. पुढील तीन वर्षे त्यांनी अनेक प्रयोग करून सन १८३५मध्ये पहिले विद्युत चुंबकीय तारायंत्र उपकरण केले. यात एक विद्युत मंडल चालू व बंद करून संकेत प्रेषण करणारा प्रेषक, संकेतांची नोंद करणारा विद्युत चुंबकीय ग्राही आणि संकेतांचे अक्षरे व संख्या यात रूपांतर करणारी सांकेतिक लिपी यांचा समावेश होता. त्यांनी योजलेली ठिपके- डॉट्स व प्रास- डॅशेस यांवर आधारलेली सांकेतिक लिपी अद्यापही त्यांच्या नावाने ओळखली जाते. ज्यात कट्ट व कड या दोन ध्वनींच्या साहाय्याने ठिपका व प्रास दर्शविले जातात. पुढे त्यांनी अधिक लांब अंतरावर संदेश पाठविण्यासाठी विद्युत चुंबकीय अभिचलित्रांच्या प्रणालीचा शोध लावला. त्यांच्या शोधाच्या विकासात त्यांना एल.डी.गेल व जोझेफ हेन्री यांचे तांत्रिक साहाय्य आणि ॲल्फ्रेड व्हेल यांचे आर्थिक साहाय्य लाभले. मॉर्स यांनी सन १८३७मध्ये आपल्या शोधाच्या एकस्वाकरिता अर्ज केला, परंतु त्यांना आपल्या शोधाला मान्यता मिळवण्यास जवळजवळ सात वर्षे वाट पहावी लागली. शेवटी सन १८४३मध्ये अमेरिकेच्या काँग्रेसने वॉशिंग्टन ते बाल्टिमोर यांच्या दरम्यान तारयंत्राद्वारे प्रायोगिक संदेशवहन प्रस्थापित करण्यासाठी तीस हजार डॉलरचे अनुदान मंजूर केले. दि.२४ मे १८४४ रोजी या योजनेद्वारे पहिला संदेश प्रेषित करण्यात आला.

मॉर्स यांच्यात नेतृत्वाचेही गुण होते. रंगभूमीवरील स्वैराचार विरुद्ध मोहीम उघडण्याचा एक भाग म्हणून त्यांनी सन १८२७मध्ये न्यूयॉर्क येथे जर्नल ऑफ कॉमर्स हे रंगभूमीसंबंधीच्या जाहिराती स्वीकारण्यास नकार देणारे नियकालिक स्थापन करण्यास मदत केली. चित्रकारांना मदत करण्यासाठी व अमेरिकन जनतेची कलाविषयक अभिरुची उंचावण्यासाठी नॅशनल ॲकॅडेमी ऑफ डिझाइन या सन १८२६मध्ये स्थापन झालेल्या संस्थेचे ते एक संस्थापक व पहिले अध्यक्षही होते. सन १८३२-३६ या काळात त्यांनी नेटिव्ह अमेरिकन चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. तिच्यातर्फे न्यूयॉर्क शहराच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणूनही ते उभे राहिले होते. परंतु राजकारणातील त्यांचा सहभाग अयशस्वी ठरला. सन १९२२मध्ये ते युरोपला गेले आणि तेथे अभ्यास, प्रवास व चित्ररेखाटन यांत तीन वर्षे त्यांनी खर्च केली. सन १८३२मध्ये अमेरिकेला परतल्यावर न्यूयॉर्क विद्यापीठात चित्रकला व शिल्पकला या विषयांच्या प्राध्यापकपदावर त्यांची नेमणूक झाली. पुढे तेथेच ते संकल्प चित्रकलेच्या वाङ्मयाचे प्राध्यापक झाले होते.

मॉर्स यांचे देहावसान वयाच्या ९९व्या वर्षी न्यूयॉर्क येथे दि.२ एप्रिल १८७२ रोजी झाले. त्यांच्या मृत्यूनंतर तारायंत्राचे जनक ही त्यांची कीर्ती दूरध्वनी, रेडिओ व दूरचित्रवाणी यांच्या शोधामुळे पुसट होत गेली, तथापि चित्रकार म्हणून त्यांची ख्याती मात्र वाढली आहे. त्यांची व्यक्तिचित्रे जगातील अनेक संग्रहालयांत प्रदर्शित केली गेलेली आहेत. त्यांचे तारायंत्र उपकरण वॉशिंग्टन येथील नॅशनल म्युझियम ऑफ हिस्टरी अँड टेक्नॉलॉजी या संग्रहालयात जतन करून ठेवण्यात आले आहे.

# वीज दरवाढीचा झटका, आता सुरक्षा ठेवीचा शॉक



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**महावितरणच्या कारभारावरून असे वाटते की ग्राहकांना शॉक देऊन मारते की काय!पहिलेच ग्राहक उन्हाळ्याच्या गर्मीने त्रस्त तर दुसरीकडे महावितरण वीज दरवाढ करून मस्त आणि आता वीज बिलासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा शॉक देऊन ग्राहकांना सरकार करीत आहे भस्म.एकीकडे महागाईने उग्र रूप धारण केले आहे तर दुसरीकडे सरकार वेळोवेळी वीजेचे दर वाढवून शॉक देतांना दिसत आहे. सोबतच पाणी कर व इतर करांमध्ये भरमसाठ वाढ होत आहे. याची संपूर्ण झळ सर्वसामान्यांना आर्थिकदृष्ट्या सोसावी लागत आहे. देशातील अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्रात विक्रमी वीज निर्मिती होते. तरीही इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज महागडी का?असा प्रश्न सर्वसामान्यांनपुढे नेहमीच भेडसावत असतो तरीही सरकार नेहमीच कोणते ना कोणते कारण सामोरं करून वीज दरवाढीचे ओझे ग्राहकांच्या खांद्यावर नेहमीच लादत असते.**


त्यामुळे ग्राहकांना कळत न कळत अदृश्य शॉक लागत असतो आणि आता महावितरणने अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या स्वरूपात महागाईच्या आगीत तेल ओतले आहे. अतिरिक्त सुरक्षा ठेव ग्राहकांनी का म्हणून भरायची ? अशा प्रश्न आज संपूर्ण ग्राहकांच्या मनात भेडसावत आहे.महावितरणाने वीज दरवाढ केली तो संपूर्ण बोजा सहन करून ग्राहक वीज बिल नियमित भरत असतात. परंतु आता महावितरणने बीलासोबत सुरक्षा ठेव पाठविली आहे ती का म्हणून ग्राहकांनी भरावी ? वीज ग्राहकांजवळ पैशाचे झाड आहे काय ? याकडे सरकार लक्ष का देत नाही ? कोणतीही सरकार असो ती सर्वसामान्यांचा बळी का घेत असते ?आज गरीब व सर्वसामान्य लोक जीवनावश्यक वस्तूंचे दर, घरगुती गॅस सिलिंडर, पेट्रोल,शिक्षणाचा अवाढव्य खर्च, आरोग्यावरील औषधींचा खर्च यामुळे गरीब व सर्वसामान्य त्रस्त होवून महागाईच्या आगीत होरपळत आहे आणि आता महावितरणने अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा डबल शॉक देऊन ग्राहकांचा जीव घेते की काय असे वाटत आहे.याकडे सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.महावितरणाजवळ पैसा अपुरा पडत असेल तर सरकारच्या तिजोरीतून किंवा राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्तीतून वसुल करावा.परंतु ग्राहकांना त्रास देणे बंद करावे. महावितरण कंपनी राजकीय पुढाऱ्यांना ज्या काही सुविधा देत असेल त्या ताबडतोब बंद कराव्यात व त्यातून महावितरणने आपला खर्च करावा.परंतु गरीब व सर्वसामान्यांचे खीशे कापणे ताबडतोब बंद करावे.कारण ग्राहकांजवळ मेहनतीचा व घामाचा पैसा आहे त्यामुळे याची दखल सरकारने व महावितरणाने घेतली पाहिजे व महावितरणाने ग्राहकांना वेळोवेळी शॉक देणे बंद केले पाहिजे. महावितरण दरवर्षी ग्राहकांच्या मागील एका वर्षातील सरासरी वीज वापराच्या आधारे अतिरिक्त सुरक्षा ठेव निर्धारित केली जाते.परंतु यंदा महावितरण दोन महिन्यांचे बील इतकी सुरक्षा ठेव वाढविली आहे याला महावितरणाची खुली लुट व मनमानी म्हणावी लागेल.त्यामुळे महावितरणने ग्राहकांची लुटमार करून फसवणूक करू नये. नागपुर जिल्हात 11 लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. वाणिज्य ग्राहकांची संख्या 1 लाख तर औद्योगिक ग्राहकांची संख्या 20 हजार आहे.एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या ग्राहकांकडील सुरक्षा ठेवीची



रक्कम कोट्यवधींच्या घरात आहे.ही कोट्यवधीची रक्कम ग्राहकांच्या खिशातून वसूल केली जाणार आहे ही महावितरणाची खुली लुटच म्हणावी लागेल.राजकीय पुढाऱ्यांना अनेक सवलतींसोबत वीज दरातही मोठ्या प्रमाणात सवलत दिली जाते आणि ग्राहकांचा विचार जेव्हा होतो तेव्हा त्यांच्यावर भरमसाठ वीज दरवाढ व सुरक्षा ठेव मोठ्या प्रमाणात आकारल्या जाते हा कसला न्याय म्हणावा ?महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती करणारे देशातील मोठे राज्य म्हणून भारतात गणना होते. सोबतच महाराष्ट्र इतर राज्यांना मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा करीत असते व ज्या राज्यांना वीज देतो तीथे वीजेचे दर कमी अतिरिक्त सुरक्षा ठेव नाहीच.परंतु महाराष्ट्र वीज उत्पादक राज्य असुन सुद्धा महाराष्ट्रात वीज दरवाढ व सोबतच अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा बोजा हा अत्यंत चिंतेचा,गंभीर आणि धक्का देणारा विषय आहे. आता वीज दरवाढीचा फटका बीपीएल ग्राहकांना व शेतकऱ्यांना सुद्धा बसणार आहे.म्हणजे राज्य विद्युत नियामक आयोगाने बीपीएल धारकांना व शेतकऱ्यांना सुद्धा वीज दरवाढीपासुन सोडले नाही ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.ज्या राज्यात वीज उत्पादन होत नाही किंवा कमी प्रमाणात होते अशा राज्यात वीजेचे दर कमी व ज्या राज्यात भरपूर वीज निर्मिती होते त्या राज्यात वीज दरवाढ करून व सुरक्षा ठेव वाढवून सरकार, राज्य विद्युत नियामक आयोग व महावितरण कंपनी ग्राहकांची गळचेपी करून लुट करीत आहे की काय असे वाटत आहे.त्यामुळे महावितरणने ग्राहकांवर लादलेला अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा बोजा रद्द करावा.कारण महावितरण वीज दरवाढीसोबतच अतिरिक्त सुरक्षा ठेविचा बोजा संपूर्ण महाराष्ट्रातील ग्राहकांवर लादु शकते.त्यामुळे सरकारने याची दखल घेऊन सुरक्षा ठेव ताबडतोब बंद करावी.

# स्त्री जीवन

आधुनिक केसरी



दिपा चिंचकर
9284900969

विचार केला तर खूप काही आणि नाही केला तर काहीच नाही. मुलगी जन्माला येते तेव्हा काही खुश तर काही खूप नाराज असतात. काहीच्या घरात तिला खूप सन्मानाची आपलेपणाची वागणूक दिली जाते तिच्या जन्माच स्वागत केल्या जात. तर काहीच्या घरात बापाच्या डोक्याला ताप आणि डोक्यावरच कर्ज मानल जात. जसजशी ती मोठी होत जाते तिच्यावर बंधने लादली जातात, बंधने ही फक्त समाजाशीच नसतात तर ती संस्कार, परंपरा आणि निसर्गाची असतात, तिच्यातले सुप्त गुण दाखवण्यासाठी ती सतत धडपडत असते तिला सिद्ध करण्यासाठी, प्रयत्न करत असते पण सरड्याची धाव कुंपणापर्यंत. हळूहळू ती वयात येते स्वप्न बघणं, नटनं, छान दिसणं हे गुण निसर्गानेच तिच्यात दिलेले असतात. पण तीचं नशीब शेवटी दुस-यांच्याच हातात असते. लग्न होत साथीदार चांगला मिळाला तर स्वर्ग....! नाहीतर नरक यातना जिवंतपणी तिला भोगाव्या लागतात. सगळ्यांच्या अपेक्षा सगळ्यांची जबाबदारी तिच्या नाजूक खांद्यावर टाकली जाते, सून घरात आली म्हणजे free फ्री कामवाली बाई मिळाली तिने सगळ व्यवस्थितरित्या केलं पाहिजे तिच्याकडून थोडीशी जरी चूक झाली तरी मोठा गुन्हा झाल्यासारखा तिला बोलले जाते.

ती कोणत्याही जबाबदारीत कमी पडली तर तुझ्या आई वडिलांना फोन करेन ही धमकी तिला ठरवलेली असतेच या सगळ्या विरोधात जर तिने आवाज उठवला तरी पक्ष्याचे पंख कसे छाटून त्याला जखमी केले जात तसच काहींच्या घरात स्त्रीबरोबर वागल जातं.. नव-याने कसही वागलं तरी चालतं... का तर त्याला टेन्शन असत पण बाईला टेंशनच नसत, ती कुठे बाहेर जाऊन थोडीच काम करते घरात बसूनच तर असते तिने भांडण केली तर बॅग भर आणि माहेरी जा तुझ्या....! असं बोलल जातं.

पण तिनं आपलं अर्ध आयुष्य या घरासाठी दिलेलं असतं. नवरा बाहेर काम करत असताना मुलांना घराला आणि येणाऱ्या जाणाऱ्या सगळ्या समस्यांना ती एकटी तोंड देत असते, घरातच तिला रोजचच जीवन चार भिंतीतच रहाव लागत. इतक सगळ करूनही ते घर तिच्या हक्कच नसत.

शेवटी सांगावस वाटत कितीही समाज सुधारला तरी आत्तापर्यंत काहींच्या घरात, स्त्रीला विचारात समान न्याय नाहीच मिळाला खरंच नाही मिळाला. इतिहासामध्ये अनेक महापुरुष स्त्रियांच्या हक्कासाठी आणि समस्या सोडवण्यासाठी लढले आणि कार्य देखील केले पण अजूनही काही प्रमाणात स्त्रियांचे जीवन हे - 'चूल आणि मुल' एवढेच आहे.



# आयुष्याच्या संध्याकाळी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**आयुष्याच्या संध्याकाळी कुणी आपलेच आपल्याशी विचित्रा सारखे वागते,नात्याचाच विछेद करते तेव्हा फार दुःख होते.खरे तर उतार वयात अपेक्षाही नसतात माणसाच्या कुणाकडून.आयुष्य उपभोगून झालेले असते.खाच खळगे ओलांडून कर्तव्ये पार पाडलेली असतात.कुणाकडून कसलीही अपेक्षा देखील नसते. काही घ्यायचे नसते.उलट जवळचे आहे ते उरले सुरले द्यायचेच असते. तरी जवळची माणसे दुरावतात,रागावतात,दूर निघून जातात,नात्याला नखं लावून ओरबाडून टाकतात,तेव्हा फार दुःख होते. यांना आयुष्यात नेमकं काय हवं आहे,सर्व काही मिळूनही,कशाची खंत आहे तेच कळत नाही. यांची नेमकी समस्या आपल्याला कळत नाही.आजार कळला तर उपाय शोधता तरी येतो.काय हवे हे कळले तर देता तरी येते.**

पण यांना आपल्याला नेमकं काय हवं हेच कळलेलं नसतं.काहीतरी होतय, कसतरी होतय,या रोगाला दवा नाही! यांना स्वतःचे निर्णय स्वतः घेता येत नाहीत.स्वतःचा विवेक वापरता येत नाही. स्वतःचे भले बुरे यांना कळत नाही.हे परावलंबी असतात. कुणाच्याही नादी लागून बहकतात. यांचा स्वतःवर ताबा नसतो. विश्वास नसतो. अधजल गागरी झलकत जाय, अशी यांची डामाडोल स्थिती असते. त्यामुळे आपल्याच जवळच्या माणसावर विश्वास ठेवण्या ऐवजी ही मंडळी भलत्याच्या नादी लागतात. पुढे त्यांचा त्यांनाच पश्चाताप होतो. पण तेव्हा वेळ निघून गेलेली असते.जवळची माणसे दुखावून दूर निघून गेली असतात. नात्यांची राख रांगोळी झाल्यावर कितीही पाणी ओतले तरी उपयोग नसतो. यांचा थिल्लरपणा यांना भोवतो.मग हे काचेचे तुकडे जोडायला सरसावतात. पण तुटलेले नाते जुळत नाही.तुटलेल्या काचानी जखमा होतात कधीही भरून न निघणाऱ्या जखमा!खरे तर परमेश्वराने याच्या पदरात सारे दान टाकलेले असते.अपेक्षे पेक्षा जास्त, योग्यतेपेक्षा अधिकच यांच्या पदरात पडले असते. पण ते पचवायची ताकद नसते.वेगळ्या कशाची तरी हाव असते.ते वेगळे नेमके काय, हेही माहिती नसते. मृगजला मागे धावण्याचा हव्यास. बाकी काही नाही. हातचे सोडून पळत्याच्या मागे लागायचं.परिणामी हातचेही निसटते.अन् ज्यामागे हे धावतात,तेही दूर निघून जाते. शेवटी पष्चातापाची वेळ येते. हे सगळे उतारवयात अन् तेही आपल्याच जवळच्या व्यक्ती बाबत आपल्याच डोळ्यासमोर घडते तेव्हा फार दुःख होते.आपले नेमके कुठे काय चुकले हेही कळत नाही. आपण नेमके कुठे कमी पडलो हेही समजत नाही. शिक्षण,पदव्या सारे सारे वाया गेले की काय असे वाटते. काही सुचेनासे होते.मन सुन्न होते. जे घडले,घडते आहे,ते घडायला नको असे खूप वाटते. पण आपली अडचण ही की आपल्या हातात काहीच नसते. तुम्ही घोड्याला पाणवठ्यावर आणू शकता.पाणी तर त्याचे त्यालाच प्यायचे असते! ही भरकटलेली आपलीच जवळची नात्यातली मंडळी चांगली शिकली सवरलेली असतात.मोठ्या पदव्या घेतलेली असतात. त्यांनी तुमच्या पेक्षा जास्त जग पाहिलेले.. तुमची धाव घराच्या कुंपणा पर्यंत.तर यांचे पासपोर्ट व्हिसा स्टॅम्प ने भरलेले..इतका अनुभव गाठीशी असूनही यांना जवळचे कोण,परके कोण हे समजत नाही. कोण आपल्या फायद्याचे सांगते,कोण आपल्याला आडवाटेवर नेते,हाही विवेक ते गमावून बसतात. जेव्हा पाय घसरून पडतात, जमिनीवर आदळतात, तेव्हा यांचे डोळे उघडतात.मग ते दुखावलेल्या नात्यांना हाका द्यायला लागतात.मग ज्यांचा आधार यांना हवा हवासा वाटतो,ते दूर निघून गेले असतात. यमाचा काही नेम नसतो.तो कुणासाठी थांबणार नसतो. त्यांच्या फोटो पुढे पष्चातपाने रडणे तेव्हढे मागच्याच्या हाती असते!ही अशी वेळ कुणावरही येऊ नये. म्हणून नाती जपा. मोठ्यांच्या



वयाचा मान ठेवा. त्यांचे सारे भोगून झाले. त्यांचे दिवस संपलेत. तुमचे बाकी आहे.तुमच्यापुढे तुमचे अर्धे आयुष्य बाकी आहे. पिकली पाने तर केव्हाही गळून पडणारच. पण ही फुलं निदान झाडावर तरी राहू द्या. त्यांना कुस्करू तरी नका. त्यांचे निर्माल्य करू नका. यांना फार काही नको. तुमचा पैसा नको. हवी आहे फक्त माया,आपुलकी.जिव्हाळ्याचे ,प्रेमाचे दोन शब्द. भेटी गाठी राहिल्या दूर.प्रत्येकाचे विश्व वेगळे, घर, कारभार, उद्योग ,संसार सारे वेगळे. तसे पाहिले तर कुणी कुणावर अवलंबून नाही. तुम्ही तुमचे सुख,तुमचा आनंद शोधायला मोकळे. तुमचे भविष्य तुमच्या हाती.त्यात कुणाची ढवळा ढवळ नाही. मग धास्ती कशाची, भीती कशाची ?दडपण कशाचे? ही संभ्रमावस्था कशाची द्योतक आहे ?तुम्हाला तुमच्यावरच विश्वास नाही का ?की नाती जपायला तुम्ही असमर्थ आहे? तुमच्याच काही अडचणी आहेत.तुमचेच काही चुकले आहे.जे तुम्हाला कबूल करता येत नाही. सहनही करता येत नाही,सांगताही येत नाही स्पष्टपणे? असे असेल तर या बध्ध कोषातून तुम्ही बाहेर यायला हवे. स्वतःची सुटका करून घ्यायला हवी बंधना पासून. कोणत्याही नात्याचे बंधन होता काम नये. जबरदस्तीचा राम राम नको. नाते संबंधात मोकळे पणा असला तरच त्या नात्याला काही अर्थ आहे. एरवी सारे नाटक. मुखवटे घालून फार काळ मिरवता येत नाही. असली नकली चेहरे कधी न कधी उघडे पडतातच. कशाला करायचे नाटक? आहेच किती प्रत्येकाचे आयुष्य? उद्याचा देखील नेम नाही. मग आहे तो हातचा क्षण का जगू नये आनंदाने, सुखाने? प्रेम करायला, मायेने गोड बोलायला पैसा नाही लागत. चुकले तर माफी मागितल्याने कुणी लहान होत नाही. आमचेही चुकले अनेकदा. वय वाढलेला प्रत्येक जण शहाणा असतो असे थोडेच आहे ?आमच्या पिढीने खूप चुका केल्या. मान्य आहे आम्हाला. पण तुम्ही तरी तशा किंवा नवीन चुका करू नका. पुढच्याला ठेच लागली तर मागच्याने शहाणे व्हायचे तरच त्याला प्रगती म्हणता येईल! सोडा, झाले गेले विसरून जा. आयुष्याच्या संध्याकाळी आमचे अश्रू पुसायला पुढे या. हे सुरकुतलेले हात फक्त तुम्हाला भरभरून आशीर्वाद देण्यास उत्सुक आहेत. संध्याकाळच्या सावल्या गडद व्हायला लागल्या आहेत. सूर्य पश्चिमेच्या क्षितिजावर रेंगाळतो आहे. या मावळत्या किरणात यथेच्छ न्हाऊन घ्या. गेलेली वेळ पुनः येत नाही. वेळच नाही, गेलेला माणूस देखील परत येत नाही!

# लोकसंख्या वाढीचा संसाधनांवर वाढता दबाव




मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा नुकताच चिनी ड्रॅगनला मागे टाकत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश झाला आहे. भारताची लोकसंख्या आता १४२.८६ कोटींवर जाऊन पोहोचली आहे. चीनची लोकसंख्या १४२.५७ कोटी एवढी असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या 'द स्टेट ऑफ वर्ल्ड पॉप्युलेशन रिपोर्ट२०२३' या अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारताची लोकसंख्या पुढील तीन दशके वाढतच राहणार असून, तिने १६५ कोटींचा टप्पा गाठल्यानंतर तिच्यामध्ये घसरण होऊ शकते. या आकडेवारीमुळे लोकसंख्या वाढीची चिंता अधिकच गडद झाली आहे. या संदर्भात लोकसंख्या नियंत्रणाबाबत व्यावहारिक धोरण तयार करण्याची शिफारसही करण्यात येत आहे.**

हे पाहता अलीकडेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनीही लोकसंख्या नियंत्रणाबाबत सर्वसमावेशक आणि सार्वत्रिक धोरण आखण्याची सूचना केली आहे. या दिशेने सरकार लवकरच पुढाकार घेईल, अशी अपेक्षा केली जात आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू नाहीत असे नाही. यासाठी अनेक दशकांपासून प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांचाच परिणाम म्हणजे भारतातील प्रजनन दर दोनच्या आसपास पोहोचला आहे. परंतु हे जे समस्येचे निराकरण सुरू आहे ते पुरेसे होणार नाही. यासाठी सर्व समाजाला समानतेने लागू होईल असे धोरण तयार करण्याची गरज असल्याचेही मोहन भागवत म्हणाले होते. प्रजनन दर सर्व समुदायांमध्ये संतुलित नसल्यास, भौगोलिक सीमा बदलण्याचा धोका असतो. तथापि, लोकसंख्या नियंत्रणासाठी व्यावहारिक आणि सर्वमान्य धोरण तयार करणे हे सोपे काम नाही. विशेषतः भारतासारख्या विविध धर्म आणि समुदाय असलेल्या देशात, वैयक्तिक निर्णयांद्वारे ठरवलेल्या मुद्द्यांवर कायद्याद्वारे शासन करणे किंवा नियंत्रित करणे हे एक तसे धोकादायक काम आहे. याचा चांगला अनुभव इंदिरा गांधींनी घेतला आहे. त्यांच्या सरकारने लोकसंख्या नियंत्रणाबाबत कडक नियम लागू केले होते. पुरुष नसबंदीसाठी त्यांनी अक्षरशः धरपकड धोरण अवलंबले. मात्र त्यामुळे त्यांचे सरकार गेले. त्या कायद्याला देशातील सर्व समाजातून तीव्र विरोध झाला.

तो अनुभव पाहता ते धोरण पुढे नेण्याचे धाडस पुन्हा कोणत्याही सरकारने दाखवले नाही. या महत्त्वाच्या आणि संवेदनशील विषयावर सर्वांनी जनजागृती मोहिमेचीच मदत घेतली. आजही त्याचाच आधार घेतला जात आहे. काही अल्पसंख्याक समुदायांमध्ये कुटुंब नियोजन हा धर्म आणि आस्थेचा विषय आहे. त्याचा अवलंब करणे ते टाळतात. अल्पसंख्याक समुदायांमध्ये त्यांची लोकसंख्या कमी असल्याने त्यांच्यात भीतीचे वातावरण आहे, त्यामुळे ते कुटुंब नियोजनासारख्या योजनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. त्याचप्रमाणे, व्यवसायाशी संबंधित असलेल्या समुदायांमध्येदेखील, त्यांच्या व्यवसायासाठी वारसांबद्दल चिंता असते. आपल्यानंतर आपला व्यवसाय कोण चालवणार याची काळजी अनेकांना सतावत असते. असे असले तरी कुटुंब नियोजनाबाबत लोकांमध्ये बरीच जागरूकता निर्माण झाली आहे. त्यामुळे उत्साहवर्धक परिणामही दिसून



आले आहेत. रोजगाराच्या समस्या, ध्येय गाठण्याची धडपड यामुळे विशेषतः शहरात कुटुंब नियोजनाला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे आता सर्रास वयाच्या पंचवीस-तीसच्या पुढे मुले जन्माला घातली जात आहेत. मुलगा असो वा मुलगी एक किंवा दोन पुरेत, अशी त्यांची धारणा झाली आहे. परंतु काही समाजांची जुनी विचारसरणी अजूनही या कुटुंब नियंत्रणाच्या आड येत आहे.

परंतु संसाधनांवर लोकसंख्येचा दबाव हे कटू वास्तव आहे आणि त्यावर मात करण्यासाठी पावले उचलावी लागणार आहेत. आता हातावर हात ठेवून चालणार नाही. लोकसंख्या अधिक असल्याचा परिणाम प्रत्येक स्तरावर दिसून येत आहेत. प्रत्येकाला योग्य पोषण मिळत नाही, ना दर्जेदार शिक्षण, ना वैद्यकीय सुविधा, आणि ना रोजगाराच्या संधी. यामुळेच भूक निर्देशांक, बेरोजगारी, निरक्षरता, आरोग्य इत्यादी बाबतीत भारत जगातील काही सर्वात खालच्या देशांसोबत उभा असल्याचे दिसून येते. हे जगातील पाचवी अर्थव्यवस्था असलेल्या देशाला शोभण्यासारखे नाही. सर्वात गंभीर बाब अशी की, एकीकडे अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे तर दुसरीकडे उत्पन्नातील असमानता वाढत आहे.बेरोजगारी वाढत आहे. लोकांच्या हाताला काम नाही. कोरोना काळात ज्यांच्या नोकऱ्या सुटल्या, काहींना त्यांनतर कमी पगारावर राबावे लागत आहे, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत दोन वर्षांनंतर अजूनही सुधारणा झालेली नाही. साहजिकच हे नाकारता येणार नाही की, देशाची मजबूत आणि शाश्वत अर्थव्यवस्था राखण्याच्या मार्गात लोकसंख्या वाढ हाही मोठा अडथळा आहे. लोकसंख्येचा वेग थांबला नाही, तर येत्या काही वर्षांत अन्नसंकट येण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याबाबत गंभीरपणे विचार आणि ठोस उपाययोजना झाल्या पाहिजेत.

# बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

आधुनिक केसरी

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही जाऊ शकतो. खारघर मधील घटना ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला आहे. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील चार दिवसात राज्यातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही



वर्षातील नित्याची बाब झाली आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ अशा घटना वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

# बाल शिक्षण काळाची गरज



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**जसा देतसे आकार कुंभार मातीच्या गोळ्याला... तशी घडवते आई तिच्या तान्हूल्या बाळाला... लहान मूल म्हणजे मातीचा गोळा असते. जसा कुंभार मातीच्या गोळ्या पासून सुंदर मडकी घडवतो. तसेच आई-वडील आपल्या बालकाला घडवत असतात. बाळ पोटात असल्यापासूनच आई त्याच्यावर संस्कार करत असते. प्रत्येक बालकाचा पहिला गुरु आईच असते. त्यामुळे आईच्या वागण्या- बोलण्याचा परिणाम बालकावर होत असतो. व बालकही आईचेच अनुकरण करते. शाळेत जाण्यापूर्वी बालक आईच्या संपर्कात अधिक काळ असते. त्या काळात चालण्या -बोलण्यापासून रोज काहीतरी नवीन शिकण्याची त्याची क्रिया सतत चालूच असते.**

प्रत्येक जीव जन्मास येतो तेंव्हापासूनच त्याच्या शिक्षणाला प्रारंभ होतो. आई ही बालकाला सर्वात जवळची प्रिय व्यक्ती वाटते. त्याला हवे नको ते आईच पाहत असते. अगदी चार-पाच महिन्याच्या बाळाशी बोलताना सुद्धा आई अगदी त्याच्यात हरवून जाते. त्याच्याशी खूप गप्पा मारते व ते बाळही आईला हसून चेहऱ्यावर वेगवेगळे हावभाव करून प्रतिसाद देते. त्यामुळे बाल शिक्षणाला सुरुवातही सर्वप्रथम घरातूनच होते. व आई-वडील ,भाऊ -बहीण ,आजी -आजोबा इत्यादी सर्व त्याला घडवत असतात. आईचा यात सिंहाचा वाटा असतो.बालक जेंव्हा शाळेत जाते तेंव्हा त्याचा संबंध शाळेतील शिक्षक वर्गमित्र व इतर कर्मचाऱ्यांशी येतो. घरानंतर शाळा हेच त्याचे संस्कार केंद्र बनते.शाळेतील प्रत्येक गोष्टीचा बालकांच्या मनावर खोलवर परिणाम होतो.त्यामुळे शाळेविषयी असे म्हणावेसे वाटते की,

**शाळा मंदिर शिक्षणाचे,**
**होती संस्कार जीवनाचे...**
**घडती नागरीक भविष्याचे**
**माझ्या महान भारताचे...**

आई-वडिलांनंतर शिक्षक हेच त्याचे गुरु असतात. व विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करतात .घराप्रमाणे शाळेतही विद्यार्थ्यांवर संस्कार होत असतात .एखादी व्यक्ती जीवनात काय बनते किंवा कोणत्या मार्गाचा अवलंब करते याला त्याच्यावर झालेले संस्कार कारणीभूत असतात. अर्थात याला काही अपवाद असू शकतो. प्रत्येकाचेच काहीतरी बनण्याचे ध्येय असते व आपल्या आवडीनुसार काहीतरी बनण्याचा प्रयत्न प्रत्येक जण करत असतो .जर बालपणापासून चांगले संस्कार झाले नाही व चांगले काय ?वाईट काय ?हे त्याला कोणी समजावून सांगितले नाही तर त्यातील फरक बालकाला कळणारच नाही. त्यामुळे कदाचित ते वाईट मार्गास लागू शकते .बाल्यावस्थेपासूनच आई त्याला जेवताना कसे बसावे ?काय खावे ? काय खाऊ नये ?कसे बोलावे ?मोठ्यांशी कसे वागावे ? इ.बाबी शिकवत असते. अर्थात आई-वडिलांचे जसे वर्तन असते तसेच मुले वागतात त्यामुळे प्रथमतः आई-वडिलांनी आपल्या मुलांपुढे आदर्श निर्माण होईल असे वर्तन ठेवावे. बालकावर चांगले संस्कार व्हावे म्हणून आईने त्याला लहानपणापासूनच आदर्श व्यक्तींच्या गोष्टी सांगाव्यात जेणेकरून त्याच्यामध्ये साहस, शौर्य ,नम्रता , देशभक्ती ,संयम व सहकार्य वृत्ती इ. गुण निर्माण होतील. जिजाऊंनी शिवराय व शंभूबाळावर योग्य ते संस्कार केले म्हणूनच अगदी प्रतिकूल परिस्थितीतही आदर्श असे दोन छत्रपती जिजाऊंनी या महाराष्ट्राला दिले. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाईंनी दत्तक पुत्र यशवंत यास उत्तम संस्कार करून डॉक्टर बनविले व पुढे यशवंताने पुण्यातील प्लेच्या रुग्णांची सेवा केली अशी अनेक उदाहरणे आपणास देता येतील. आपण समाजात विविध प्रवृत्तीची माणसे पाहतो त्यामध्ये काही शांत, काही रागीट, काही प्रेमळ, काही उत्तम मार्गदर्शक ,काही मदतीसाठी नेहमी तत्पर असणारे तर काही नेहमी इतरांचे वाईट चिंतनारे असे वेगवेगळे लोक आपल्या पाहण्यात येतात त्यांच्या या स्वभावाला त्यांच्यावर झालेले संस्कार कारणीभूत असतात. मोठे झाल्यावर एखादा मुलगा चोर झाला तर कुठे ना कुठेतरी त्याच्या चोर बनण्यामागे त्याच्या आई- वडील जबाबदार असू शकतात .कारण



बालकाने शाळेतून जर एखादी वस्तू घरी आणली किंवा बाहेरून कोणालाही न विचारता घेतली व आईनेही ती वस्तू कसलीही चौकशी न करता ठेवून घेतली तर त्याला तशीच सवय लागते एक प्रकारे प्रोत्साहनच मिळते व वेळेवरच जर आई-वडिलांनी त्याला असे करण्यापासून रोखले तर तो पुढे असे वागणार नाही त्यामुळे प्रत्येक आईचे हे कर्तव्य असते की आपल्या पाल्य बाहेर कसा वागतो ?त्याची /तिचे मित्र- मैत्रिणी कोण आहेत ?वाईट लोकांच्या संगतीत तर आपलं लेकरू नाही ? याकडे लक्ष असावे लागते. आजच्या मोबाईलच्या युगात तर हे पाहणे अत्यंत आवश्यक झाले आहे .लहानपणापासूनच मुलांना मोबाईलचे वेड लागले आहे .काही मुलं मोबाईल पाहिल्याशिवाय जेवण सुद्धा करत नाहीत व त्यामुळे ते खूप हट्टी बनतात मुलांना मागेल ती वस्तू अगदी सहज मिळत गेली की त्या वस्तूची त्यांना किंमत वाटत नाही. त्यामुळे त्यांना प्रत्येक गोष्ट मागितल्या बरोबर दिली जाऊ नये काही वेळा नकार सुद्धा त्यांना पचवता आला पाहिजे. तेवढा समंजसपणा पालकांनी त्यांच्यात निर्माण केला पाहिजे. तरच ते पुढे चांगले नागरिक घडतील .

काही पालक मुलांना प्रत्येक गोष्ट मागितल्याबरोबर देतात त्यामुळे मुलांना पुढे अनेक अनावश्यक गोष्टींसाठी पैसे खर्च करण्याची सवय लागू शकते. पालकांच्या मनात हाही एक दृष्टिकोन असतो की ज्या गोष्टी आपल्याला मिळाल्या नाहीत त्या गोष्टींपासून आपली मुले तरी वंचित राहू नये .हा दृष्टिकोन थोडा योग्य असला तरीही त्यामध्ये अतिरेक होता कामा नये .कारण आज-काल मुलांना घरचे जेवण करण्यापेक्षा बाहेरचे खाण्याकडे जास्त कल असलेला दिसतो फास्ट फुडच्या या जगात मुलं सर्रास बाहेर खाऊन येतात व त्याचा आरोग्यावर दुष्परिणाम झालेला दिसतो म्हणूनच बालपणापासूनच मुलांना शक्यतो घरी बनवलेले पदार्थ खाण्याची सवय आईने लावावी .रोजच्या जेवणात वेगवेगळे पदार्थ बनवून मुलांना पौष्टिक व सकस आहार कसा देता येईल याकडे लक्ष द्यावे .यामुळे त्यांचे आरोग्य ही चांगले राहील व अनावश्यक पैसेही खर्च होणार नाहीत. यातून मुलांनाही बचतीची सवय लागेल.आपल्या पाल्याच्या आवडीप्रमाणे त्याच्यात असलेले गुण कसे विकसित करता येतील याकडे लक्ष द्यावे. इतर मुलांची तुलना करण्यापेक्षा आपल्याच मुलांमध्ये असलेल्या गुणांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहित करावे. त्याचा गृहपाठ व इतर गोष्टीकडे वैयक्तिक लक्ष द्यावे. आपल्या अपेक्षांची ओझे मुलांवर न टाकता त्यांच्या आवडीनुसार व कुवतीनुसार त्यांना संधी द्यावी असे केल्यास आपले बालक निश्चितच जीवनात एक दिवस यशस्वी होईल व इतरांसाठी आदर्श निर्माण करेल यात मुळीच शंका नाही.

# डॉ. आंबेडकर यांच्या नावाचा सोईनुसार वापर थांबवा



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा वापर सोयीनुसार करून सामाजिक व राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न या ठिकाणी सुरू आहे.एखाद्या शब्दाचा किंवा एखाद्या वक्तव्याचा सरळ सरळ अर्थ काढून त्यामागची कोणतीही पार्श्वभूमी न बघता, बाबासाहेबांच्या विचाराची मांडणी होताना दिसत आहे जे विचारधारेने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला व भारतीय संविधानाला पूर्वीपासून आजपर्यंत विरोध करून, लोक कल्याणाच्या व देशहिताच्या विरोधात विचारसरणी निर्माण करून, देशांमध्ये अराजकता निर्माण केली. असे लोक सुद्धा बाबासाहेबांच्या नावाचा वापर करून चुकीच्या पद्धतीने बाबासाहेब सांगण्याचा प्रयत्न होत आहे. हे अत्यंत घातक असून बाबासाहेबांच्या विचाराचा दुरुपयोग होय.**

बाबासाहेबांचे कोणतेही विचार व कार्य याचा अर्थ समजून घेताना सरळ सरळ शब्दशः अर्थ न समजून घेऊन, त्या शब्दाच्या त्या कार्याच्या मागची जी पार्श्वभूमी आहे, ती पार्श्वभूमी समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. तरच बाबासाहेब आंबेडकर समजतील. दुसरी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाबासाहेब आंबेडकरांच्या एखादं विधान किंवा एखाद्या कार्यावर मोघमपणाने चर्चा करून ती व्यक्ती स्वतः आंबेडकरवादी आहे असे म्हणणे थोडेही उचित नाही. बाबासाहेबांच्या अनेक कार्याचा, विचाराचा सोयीनुसार वापर करून, समाजामध्ये दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हे थांबून बाबासाहेब आंबेडकरांचे सत्य विचार, सत्यकार्य व त्या मागची पार्श्वभूमी या सर्व गोष्टी एकत्रितपणे मांडून, त्याचे विश्लेषण करणे हे महत्त्वाचे आहे. तरच बाबासाहेब आंबेडकर आम्हाला समजतील, अन्यथा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा कार्याचा विचाराचा दुरुपयोग होईल. जसे आज आरक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य या नावाखाली अनेक प्रकारचे गैरसमज समाजामध्ये जाणीवपूर्वक पसरवण्याचा प्रयत्न सुरू आहे. जर शब्दशः अर्थ घेऊन त्याची पार्श्वभूमी न तपासतात ती बाजू मांडणे म्हणजे अपूर्ण बाजू होय. अपुर्ण बाजुवरून बाबासाहेबांचे विचार व कार्य आपण कधीही पूर्णपणे स्पष्ट करू शकत नाही. किंवा सांगू शकत नाही. हेही तेवढेच सत्य आहे. आरक्षणाच्या बाबत आरक्षणाचा मुद्दा समोर करून आरक्षणाची तरतूद बाबासाहेबांनी निर्माण करून दिली म्हणून आरक्षण मिळायलाच पाहिजे अशी चर्चा निर्माण करून, आरक्षणावरती वाद निर्माण करण्यात सरकार यशस्वी झाले. आहे त्या मागची कोणतीही पार्श्वभूमी समजून न घेता, आरक्षणाचा मुद्दा गरिबी हटाव मोहिमेची जोडण्यात आलेला आहे. बाबासाहेबांनी



आरक्षण दिले हे सर्वांना मान्य आहे. परंतु ते का दिले याची पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. आरक्षण म्हणजे गरीबी हटाव चा कार्यक्रम मुळीच नाही. आरक्षणे प्रतिनिधित्व आहे. आरक्षण प्रतिनिधित्व बहाल करते. त्यामुळे हजारो वर्षापासून ज्या समाजाला समूहाला शैक्षणिक, सामाजिक दृष्ट्या मागास बनवले गेले. त्या लोकांना प्रवाहामध्ये आणण्यासाठी, त्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची तरतूद बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली आहे. ज्या लोकांचा प्रतिनिधी आहे, ज्या लोकांची, सत्ता संपत्तीमध्ये भागीदार आहे, त्या लोकांना आरक्षणाची गरज नाही. सत्ता संपत्तीमध्ये ज्या समाजाची भागीदारी आहे त्या समाजाने समाजातील गोरगरीब जनतेसाठी वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून गरिबी निर्मूलन व उद्योगास प्राधान्य अशा गोष्टी करणे आवश्यक असते. आज पर्यंत ज्यांना सत्ता संपत्ती मध्ये येण्याचे सर्व रस्ते बंद होते, त्या समुदायाला सत्ता संपत्तीमध्ये येऊन प्रतिनिधित्वाच्या मार्फत समतेची व्यवस्था बाबासाहेबांनी निर्माण केली. जे अगोदरच सत्ता संपत्तीचे भागीदार होते त्यांनी आपल्या अधिकाराचा योग्य वापर करून जे गोरगरीब लोकांच्या विकासाचे ध्येय धोरणे आखून, त्यांचा विकास करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी असे करता स्वतःचेच घरी भरायला सुरुवात केली, व सर्वसामान्य जनतेला अंधश्रद्धा, पाखंड, यामध्ये गुरफटून ठेवले. त्यामुळे अनेक वर्षापासून ज्या लोकांचे सत्ता, संपत्ती मध्ये प्रतिनिधित्व व भागीदारी होती, त्या लोकांचाही समाज आज गरीब आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही, परंतु आरक्षण गरीबी हटाव कार्यक्रम आहे हेही मानने उचित वाय योग्य नाही. म्हणून अशा पद्धतीने चुकीचा प्रचार, प्रसार करून बाबासाहेबांच्या कार्याचा व विचाराचा सोयीस्कर वापर करणे टाळाले गेले तरच सर्वांगीण व योग्य तो विकास होईल. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाबत, बाबासाहेबांच्या नावाचा वापर करून लोक जगत आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्य बाबासाहेबांनी दिले,परंतु त्यांच्या नावाचा वापर करून व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊन, वर्तन करणे हे चुकीचेच आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे स्वतःच्या मनानुसार, स्वतःच्या इच्छा नुसार, भारतातील कोणत्याही व्यक्तीन, कोणताही भेद न करता आपले जीवन जगणे, व इतर कोणत्याही समाजाला, माणसाला धक्का न पोचता आपली मत व्यक्त करणे, किंवा आपल्या वक्तव्यामधून किंवा कृती मधून सामाजिक वाद निर्माण न होता, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे कोणतेही कृत्य न करता सभा घेणे, संमेलने घेणे, म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य होय. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे एक व्यक्ती, एक समुदाय या सर्वांना लागू आहे. परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा व बाबासाहेबांच्या नावाचा वापर करून अनेक ठिकाणी चुकीच्या गोष्टी घडत असल्याचे समोर येत आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली वेगवेगळ्या संस्कृती, बुद्धी, तर्क, विज्ञान यांना न पटणाऱ्या गोष्टी देखील घडताना दिसत आहे. हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे लक्षण नाही. किंवा या साठी अभिव्यक्ती स्वातंत्र्यही नाही. इतरही अनेक बाबी आहेत ज्याद्वारे बाबासाहेबांचा एखादा शब्द पकडून त्यावरती चुकीचे अर्थ काढले जातात, स्वतःला आंबेडकरवादी समजणारे लोक बाबासाहेबांनी शिकलेल्या लोकांनी राजकारणामध्ये येण्याचा संदेश दिलेला आहे. असे सांगून सगळेजण राजकीय नेते होत आहेत. याचाच परिणाम आज राजकीय नेते जास्त, व कार्यकर्ते कमी झालेले आहेत. सुशिक्षित व्यक्तीने राजकारण जरूर करावे परंतु प्रत्यक व्यक्तीने नेता होण्याचे स्वप्न मुळीच बघू नये. सर्वांना जर नेता व्हायचं असेल तर कार्यकर्ते कसे निर्माण होतील ? आणि चळवळीला दिशा कशी मिळेल ? हा संशोधनाचा विषय राहू शकतो. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माचे आचरण करण्याचा अधिकार दिला परंतु याचा अर्थ असा नाही की प्रत्येक ठिकाणी धर्म धर्म करून धर्माच्या नावाने अंधश्रद्धा, पाखंड, विषमता, पसरवून लोकांना अज्ञानी व मानसिक दुर्बल बनवणे, धर्माच्या नावाखाली शिक्षणापासून दूर ठेवून, शैक्षणिक गुणवत्ता कमी करणे असे मुळीच नव्हे. परंतु आज धर्माच्या नावाखाली विज्ञानाच्या विरोधात अनेक कृत्य होत आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा कोणताही विचार न करता केवळ धर्म म्हणून त्यांच्या डोक्यामध्ये अंधविश्वास पेरला जात आहे. आणि धर्माला सार्वजनिक करून तो इतरांवर लादण्याचा सुद्धा प्रयत्न केला जात आहे. धर्म ही बाब चार भिंतीच्या आतली असून बाहेर मात्र माणूस भारतीय म्हणून आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समजून घेताना फक्त शब्दशः अर्थ व सोयीनुसार अर्थ घेऊन बाबासाहेब समजून सांगू नये, किंवा त्याचा गैरफायदा घेऊ नये. त्यामुळे खरे बाबासाहेब समाजामध्ये रुजणार नाहीत. असे कोणी करत असेल तर जाणकार व जागृत लोकांनी ते थांबवणे आवश्यक आहे. त्यावर सखोल असे स्पष्टीकरण देऊन त्या मागची पार्श्वभूमी देखील सांगणे आवश्यक आहे. तरच बाबासाहेबांच्या विचाराचा, कार्याचा खरा प्रचार आणि प्रसार समाजामध्ये होईल. आणि बाबासाहेबांचा विचाराचा व कार्याचा सोयीनुसार वापर पुणे थांबेल.

# सिंह आणि लांडगा

आधुनिक केसरी

एक सिंह आणि लांडगा असे दोघे वनातून फिरत असताना त्यांच्या कानी काही मेंढ्यांचा आवाज आला. तो आवाज ऐकून मोठ्या बढाईने लांडगा सिंहाला म्हणाला, महाराज, तुम्ही आता चालून चालून दमला असाल, तेव्हा तुम्ही इथेच बसा. मी तुमच्यासाठी दोन-चार मेंढ्या मारून आणतो. याप्रमाणे बोलून लांडगा मेंढ्यांच्या आवाजाच्या रोखाने गेला असता त्याला त्या मेंढ्यांच्या कळपाजवळ मेंढ्यांचा धष्टपुष्ट मालक आणि चार शिकारी कुत्रे असल्याचे दिसले. त्याबरोबर तो लांडगा परतपावली सिंहाकडे आला व सिंहाला म्हणाला, महाराज तुम्ही तर या जंगलाचे राजे आहात आणि तिकडे उभ्या असलेल्या मेंढ्या रोगट आणि अशक्त आहेत. इतक्या साऱ्या मेंढयामध्ये एकही मेंढी चांगली नाही तेव्हा आपण दुसरी कोणती तरी शिकार करणेच बरे होईल. सिंहानेही शिकारी कुत्र्यांचा आवाज ऐकला होता त्यामुळे सिंहाला लांडग्याचा धूर्तपणा लक्षात आला. **तात्पर्यः आपली असहाय्यता लपविण्यासाठी काही ना काही सबबी पुढे करणे हा प्राणीमात्रांचा स्वभाव आहे.**



# तीन दशकांनंतर चंपावती विद्यालयात स्नेहमिलन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** सुटीच्या दिवशी शांत..निवांत वाटणारा बीडच्या चंपावती विद्यालयाचा परिसर..आज याठिकाणी मुलां..मुलींची लगबग सकाळ पासूनच सुरु झालेली होती..मुलां..मुलींच्या अंगावर युनिफॉर्म होते... अगदी बरोबर.. अहो ३१ वर्षां नंतर चंपावती विद्यालयाचा हा परिसर फुललेला होता.. बहरलेला होता. तो शाळेतील माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमिलन सोहाळ्यांनी.. महाराष्ट्राच्या नव्हे विविध राज्यांच्या कानाकोपऱ्यातून या शाळेचे १९९१-१९९२च्या बॅचचे विद्यार्थी एकत्रित आलेले होते.अहो..रुपाली कुलकर्णी ही विद्यार्थिनी तर चक्क बेंगलोरहून स्नेहमिलनाच्या सोहळ्यात सहभागी झालेली होती. चंपावती विद्यालयातील स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन सहा महिन्यां पासूनच सुरु झालेले होते.
डॉ.सचिन नागापूरकर, सचिन बोरसे, प्रसाद गिरीधारी, प्रसाद दिक्षित, महेश रामदासी, शिल्पा रणदिवे( धोंगडे ), प्रसाद गिरधारी, महेश रामदासी, डॉ.संतोष शिंदे , समृध्दी डोणगावकर, मंजुषा देशपांडे, मानसी देशमुख , सोनाली कुलकर्णी, शुभांगी कुलकर्णी देवेंद्र मुळे, रणजित वर्मा, शिल्पा जोशी , अभय जोगदंड, वैभव रायमोहकर, शिवणकर परिवारच हजर होता , ऋषिकेश पानगावकर अशा एक ना दोन अनेक विद्यार्थ्यांनी विलक्षण परिश्रम घेतले.चंपावती विद्यालयात स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन केले. साऱ्यांचेच डोळे दिपवून टाकणारे इतके अप्रतिम केलेले होते.
बीडच्या चंपावती विद्यालयातील संपूर्ण परिसर विद्यार्थ्यांच्या लगबगीनी बहरून आलेला होता. विद्यार्थी दशेतील वातावरणाची निर्मिती केली होती . यावेळी विशेष म्हणजे या मुला मुलींना इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत शिकविणाऱ्या सर्व शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना निमंत्रित करण्यात आलेलं होतं. जे हयात होते ते सर्वजण उपस्थित होते . चंपावतीच्या ग्राऊंडवर सर्व शिक्षक उपस्थितीत होते. डी,एस,कुलकर्णी सरांनी आदेश दिल्या बरोबर शंभर मुलं-मुली शाळेच्या गणवेशात मैदानावर हजर झाली. त्याकाळी ज्या प्रमाणे सर आदेश देतील त्याप्रमाणे शाळेच्या शिस्तीनुसार प्रथम सावधान विश्राम..नंतर राष्ट्रगीत.. प्रतिज्ञा ..झाली. डी.एस. कुलकर्णी सरांनी .. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची प्रार्थना म्हटली.. सर्वांनी एक सुरात पूर्वीप्रमाणे प्रार्थना म्हटली.. लगेचच एका रांगेत मुलं.. मुली शिस्तीत वर्गात गेले...नंतर सर्व शिक्षक वर्गात जाताच... विद्यार्थ्यांनी..." एकसाथ नमस्ते "... म्हणत अभिवादन केले.प्रत्येक प्रसंग चंपावती विद्यालयातील तीन दशकांपूर्वीच्या शाळेतील प्रत्येकानी अनुभवलेल्या प्रसंगाची आठवण करुन देत होता. त्यानंतर खऱ्या अर्थाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सरस्वतीस्तवन..दीपप्रज्वलन झाले . यावेळी सर्व विद्यार्थी विद्यर्थिनी यांनी आपली ओळख नाव.. सध्या काय करतात ..कोठे आहेत.. हे सांगितले. आपल्या आवडत्या गुरुजींच्या आठवणी त्यावेळीच्या आठवणींना उजाळा दिला. त्यामुळे वातावरण खुपचं भावुक झाले. त्यानंतर सर्व गुरुजनांचे शाल



..श्रीफळ.. पुष्पगुच्छ.. स्वामी विवेकानंद यांचे "शिक्षण" हे पुस्तक देऊन गुरुजनांचे स्वागत केले गेले. जाधवबाईना एक पाठही घेण्याची. विनंती करण्यात आली, या नंतर विद्यमानमुख्याध्यापिका नयना कुलकर्णी मॅडम यांनां एसएससी १९९२च्या बॅचची आठवण राहावी म्हणून शाळेसाठी एक नवीन कोरी हार्मोनियम ( संवादिनी )भेट देण्यात आली.१९९१-९२च्या सगळ्या बॅचच्या मुलांचे सर्व गुरुजींनी आपल्या भाषणातून खूप कौतुक केले. याबॅच मधिल मुलां.. मुलींनी भारतातच नव्हे तर भारत देशाबाहेर सुध्दा आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे असे मनोगत व्यक्त केले. तीन दशकांच्या नंतर अतिशय परिश्रमाने आयोजित केलेल्या या स्नेहमिलन सोहळ्याचे सुत्रसंचलन अतुल मुळे, शिल्पा धोंगडे, मंजुशा देशपांडे या तीन विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर रितीने केलेले होते.चंपावती विद्यालयातील स्नेहमिलनाचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर " अमृत मंगल कार्यालय " नंतरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अमृत मंगल कार्यालयात सारे गुरुजन येताच.. प्रवेशद्वाराच्या पासून कार्यालया पर्यंत फुलांच्या पायघड्या सजवल्या होत्या. सकाळी शाळेच्या गणवेशात दिसलेली परंतु आता मात्र सुन्दर पेहराव्यानी सजलेली मुलं..मुली दोन्ही बाजूंनी आपल्या आदरणीय गुरुजनांवर फुलांचा.. पाकळ्यांचां वर्षाव करीत होती.गुरुजनही पुष्पवृष्टीमुळे भारावून गेले... सारी मंडळी ही मंगल कार्यालयाच्या प्रवेशद्वारात आली.भरजरी पैठणी . नऊवारी साडी , नाकात नथ अशी भारतीय संस्कृतीचे जतन केलेल्या गजरे माळलेल्या..दाग.. दागिण्यांनी सजलेल्या सुवासिनींनी आपल्या गुरुंचे औक्षण दरवाज्यातच केले. औक्षणां नंतर सुंदर सोफ्यावर विराजमान झालेल्या गुरुंचे पाद्यपूजन..कुंकुमार्जन केलें गेले. त्यानंतर प्रत्येक गुरुच्यां गळ्यात मोत्यांचे हार परिधान करण्यात आले. प्रत्येक गुरुनां सुंदर तांब्याचा कलश भेट देण्यात आला.कुंदा मिरगे ( भणगे ) हिने सुंदर आवाजात गुरुवंदनेचे सादरीकरण केले.
असं स्वागत केलेलं पाहून सर्व शिक्षकांचे नी वासुदेव निलंगेकरांचे डोळे कधी पाणावले हे ही त्यांना समजलें नाही. जवळपास सगळीच मुलं ही निलंगेकर सरांच्या क्लासचे विद्यार्थी होते त्यामुळे वासुदेव निलंगेकरसरांचा यथोचित मान.. सन्मान या निमित्ताने करण्यात आलेला होता. हाच सर्व मुलांचा आग्रह होता. त्यानंतर सर्व गुरुजनांना स्वादिष्ट पक्वांनाचे " शाही भोजन " आग्रह करुन वाढण्यात आले.
जेवणा नंतरही आपल्या गुरुजनांच्या हातांवर मुलांनी पाणी घालून रुमालाने पुसुन दिले..शेवटी अमृत मंगल कार्यालयाच्या सभागृहाच्या पासून ते बाहेरील रस्त्यापर्यंत आपल्या गुरुजनांना सोडण्यासाठी मुलं.. मुली त्यांचा हात हाती घेऊन निरोप देत होते... मुलां..मुलींचे डोळे पाणावले होते...सर्व गुरुजनांचे ह्रदय आनंदाने भरून आले होते.. मुलां मुलींनी केलेल्या या प्रेमाच्या वर्षावानी तेही भारावून गेलेले होते...भाव भावनांच्या या आनंदोत्सवात प्रेमाच्या वर्षावानी सारेजणंच न्हाऊन निघाले होते...



## एमआयएमतर्फे न.पं. कार्यालयात निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील गट नंबर 17 मधील विवेकानंद नगर येथील नकाशाप्रमाणे असलेली ओपन स्पेस त्वरित रिकामे करून त्यामध्ये नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात नगर N.A.44 असून माहिती अधिकार यामध्ये आपल्या कार्यालयामध्ये सदरील नकाशा प्राप्त केला त्या नकाशामध्ये ओपन स्पेस 36 56 असे क्षेत्र असून त्यावर भूखंड माफियाचे मोठे मोठे घर बांधलेले आहे ते त्वरित हटविण्यात येऊन ते ओपन स्पेस त्वरित रिकामा करण्यात यावा त्यामध्ये नागरिकांना गार्डन जिम सारख्या सोयी सुविधा तत्काळ करण्यात याव्या न झाल्यास आपल्या कार्यालयासमोर एम आय एम लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असे एम आय एम पक्षाचे तालुका अध्यक्ष भगवान गंगावणे भगवान गंगावणे यांनी दैनिक आधुनिक केसरी प्रतिनिधी यांना प्रतिक्रिया दिली.

## सुधीर कोर्टीकरांचा नाणे, टपाल तिकीट संग्रह पाहून बच्चेकंपनी आनंदली

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** झी किडस प्रशालेनी त्यांच्या मीलकॉर्नर शाळेतील मुलांच्या समर कॅम्पमधे प्रसिद्ध नाणें आणि टपाल तिकीटं संग्राहक सुधीर कोर्टीकर यांचे दुर्मिळ नाणे.. दुर्मिळ टपाल तिकीटे... काडेपेटीची लेबल्स यांच्या संग्रहाचे प्रदर्शन आयोजित केले होते. हे प्रदर्शन पाहून बच्चेकंपनी आनंदून गेली. प्रदर्शनाचे उद्घाटन प्रशालेच्या प्रिन्सिपॉल रजनी नागवंशी यांनी केले. सामाजिक नेते अझिम सिद्दिकीअध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऐश्वर्या जगताप यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत शाल श्रीफळ पुष्पगुच्छ स्मृतिचिन्ह देऊन देऊन मेहेक शेख हिनी केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन लक्ष्मी उचाडे हिनी केले. नाण्यांची सुरुवात झालेली पंचमार्क नाणी चलनातील दुर्मिळ कवड्या ,मोहंमद तुगलघ, हुमायून, जहांगीर , अकबर, राजा शिवछत्रपती, पेशवे , ब्रिटिश कालीन , अशी नाणी व नोटांही प्रदर्शनात मांडलेल्या होत्या.त्याच बरोबर दुर्मिळ टपाल तिकीटे , काडेपेटीची लेबल्स ...त्यांनी काढलेलीपेंटिंग..हस्तकलांचा प्रदर्शनात समावेश होता. त्यानंतर सुधीर कोर्टीकरांनी विद्यार्थ्यांना फुलांच्या रांगोळ्या, धान्यांच्या रांगोळ्या, रंगाच्या रांगोळ्या कशा पद्धतीने काढावयाच्या यांचे प्रशिक्षण दिले... मुलांच्या आग्रहस्तव



सुधीर कोर्टीकरांनी विविध प्रकारच्या आवाजाची मिमिक्री करुन साऱ्यांनाच हासविले. आपल्या शालेय जीवना पासुनच एकतरी छंद आपणं जोपासायला पाहिजे. हे छंदच आपणांस एकाग्रता वाढवीतात.. हीच एकाग्रता आभ्यासात उपयोगी पडते असे आपल्या भाषणातून सुधीर कोर्टीकर यांनी सांगितले... विद्यार्थ्यांच्या बरोबर अनेक पालकांची उपस्थितीही मोठी होती. आपण देखील आपल्या शाळेत कोर्टीकरांचे प्रदर्शन कोणतेही मानधन न देता आयोजित करु शकता.

## लालपरी बसला गोळेगावचे वावडे

### दोन तास उन्हात थांबूनही बस थांबेना

आधुनिक केसरी न्यूज

संभाजीनगर ते जळगाव यादरम्यान बऱ्याच बसेस धावतात परंतु संभाजीनगर हुन निघालेली बस ही जे आत मधील फाटे आहे उदाहरणार्थ पाथरी फाटा, फरशी फाटा, खामगाव फाटा, वडोद बाजार, निल्लोड फाटा, पाल फाटा, गोळेगाव, वाकोद, पाळधी या ठिकाणचे तिकीट नसल्याने सांगत वाहक प्रवाशांची हेंडसाळ करत आहे. तसेच जळगाव जील्हातील आगारातील वाहक अक्षरशा प्रवाशांना अरेरावी ची भाषा करतात तसेच जळगावहून संभाजीनगर कडे येणाऱ्या बसेस ह्या गोळेगाव चौफुली येथे न थांबता सरळ निघून जातात प्रवासी दोन तास ताटखाळत बसुन ही उभे राहतात भर उन्हामध्ये आज खूप मोठा अनुभव आला जळगावहून संभाजीनगर कडे जाणाऱ्या संभाजीनगर डेपोची बस क्रमांक एम.एच. 2041, ही दुपारी एक वाजे दरम्यान गोळेगावहून निघाली परंतु गोळेगाव चौफुली येथे सात ते आठ प्रवासी उभे असतानादेखील गोळेगावला येथे प्रवाशांनी हात देऊन देखील त्या बस तिथे थांबली नाही. नंतर सोयगाव आगाराची एम एच 20 0961 ही बस देखील थांबली



नाही कारन त्यात जास्त प्रवाशी होते. तसेच सिल्लोड आजाराची एमएच 13 सीई ओ 7985 ही बस देखील गाडीत जास्त प्रवासी नसताना थांबली नाही अशा प्रकारे प्रवाशांची जी हेंडसाळ होत आहे. ती कुठेतरी थांबावी यासाठी सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने समाजसेवक सुमित पंडित यांनी सिल्लोड आगार येथे प्रवाशांची हेंडसाळ थांबावी व खेड्यापाड्यांमध्ये जाणाऱ्या बसेस ला सर्व थांबे द्यावे अशी मागणी माणुसकी समूहाचे समाजसेवक सुमित पंडित यांनी आगार प्रमुखांना पत्राद्वारे केली आहे. व सिल्लोड आगारातून अंभई, जळकी वसई, जळकी, सोयगाव, वालसंगी, जाणाऱ्या बसेस गोळेगाव बस स्थानकावर न जाता चौफुलीहूनच टन मारून निघून जातात त्यांना गोळेगाव येथे आपल्या बसेस घेऊन जाण्यासाठी आगर प्रमुख यांना विनंती करण्यात आली आज बस का तोट्यात चालल्या याचे सार्थ उदाहरण आपल्यास बघावयास मिळत आहे, की चालक वाहकाच्या हलगर्जीपणामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे हा त्रास कुठेतरी थांबावा व वाहक चालक यांच्यावर आगर प्रमुखांचे नियंत्रण आहे की नाही हा मुद्दा नेमका आज उपस्थित होत आहे तरी आगर प्रमुखांना विनंती आहे की प्रवाशांची हेंडसाळ कुठेतरी थांबवावी याकरिता सिल्लोड विभाग नियंत्रक श्री सतीश अंभोरे सिल्लोड आगर टि आय,व पी आय अवसरमल सिल्लोड आगार असे आव्हान माणुसकी समुहाच्या वतीने पत्राद्वारे केली आहे.



## नरहरी महाराज दिंडी सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** दिंडीचे चालक वैकुंठवासी हभप नामदेव महाराज सोणवने वासडीकर यांच्या ऊत्तरकार्यानिमित्त हभप बाळकृष्ण म बुरकुल आळंदी यांची किर्तन सेवा झाली.

प्रमुख उपस्थिती नरहरी महाराज दिंडीचे विणेकरी हरिभक्त पारायण कैलासजी महाराज ढेपले पाथ्रीकर तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर दिंडीचे अध्यक्ष एस. बी. अकोलकर साहेब सरपंच हतनुर, दिंडी चालक हभप किसनराव निकम, हभप भागवतबाबा वासडीकर, देविदास पाटील काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य पळशी दिंडीतील वारकरी एकनाथ निर्मळ साखरवेल, नारायण आबा सोमाशे, राजुभाऊ चौथे, देरळ भोकनगाव, भजनी मंडळी कन्नड चिकलठाणा शिवराई पिशोर समस्त ग्रामस्थ भजनी मंडळी वासडी कारभारी काका अकोलकर कैलास आबा अकोलकर प्रमुख उपस्थिती होती.



# आमदार फारुक शाह यांच्या हस्ते मोहाडी येथे कामाचा शुभारंभ !

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहराच्या विविधभागात विकास कामे राज्यमार्ग लेखाशीर्ष अंतर्गत धुळे महामार्ग मोहाडी ते कुळथे पर्यंतच्या २ कोटी ३६ लाख रुपये रस्त्याचे सुधारणा करण्याचा कामाचे आमदार फारूक शाह यांच्या हस्ते शुभारंभ...! शहरातून मोहाडी, रानमळा,मोघण, कुळथे या रस्त्याची अवस्था दयनीय झाली होती हा मधला मार्ग धुळेकर व ग्रामीण भागातील नागरिकांना मोघणला जोडणारा असून या मार्गामुळे धुळेकर नागरिकांना थेट मधून शिरूडपर्यंत जाण्याचा शॉटकट मार्ग आहे. बहुतेक ग्रामीण भागातील नागरिक या रस्त्याचा वापर करतात परंतु या रस्त्याची व्यवस्था फारच वाईट झाल्याने लोकांना या मार्गावर वापर करणे कठीण होत होते. यासाठी याभागातील नागरिकांनी आमदार फारुख शाह यांच्याकडे एका निवेदनाद्वारे हा रस्ता मंजुर व्हावा म्हणून मागणी केली होती. आमदार फारुख शाह यांचे काम धुळे शहरात चालूच असून ग्रामीण भागातील कब्रस्थान व अन्य सुविधांसाठी सुद्धा आमदार फारुख शाह शासनाकडून निधी आणण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचाच हा एक भाग म्हणून हा रस्ता धुळे शहरातील लोकवस्तीतून जात असल्यामुळे महत्वाचा व जास्त रहदारीचा होता. त्यामुळे रस्त्याचे रुंदीकरण करणे व विविध ठिकाणी पाईप-मोरी करणे आवश्यक होते. त्यासाठी आमदार साहेबांच्या प्रयत्नाने या रस्त्यासाठी हा निधी मंजुर झालेला आहे. त्याचे आज आमदार फारुख शाह यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यामूळे या भागातील नागरिकांनी आमदार फारुख शाह यांचे आभार मानलेले आहेत. या कार्यक्रमाच्या वेळेस माजी नगरसेवक विनायक शिंदे,युवा नेते आकाश शिंदे,नगरसेवक गनी डॉलर,नगरसेवक मुक्तार अन्सारी,माजी नगरसेवक,साबीर सैय्यद,निजाम सैय्यद,प्रविण अग्रवाल,कुणाल पवार,प्यारेलाल पिंजारी,योगेश शिंदे,महेंद्र राजपुत,आसिफ पोपट शाह,,जमील खाटीक,सोनू भादाने,मोहन मराठे,नितीन पाटील,संदीप शिंदे,गणेश बडगुजर,अमोल शिंदे,प्रविण पाटील,वाहिद सैय्यद,मंगेश खैरनार, बलजित बग्गा,सतार शेख,मुस्ताक शाह,नजर खान मनोज शर्मा, व मोठ्या प्रमाणात शहरातील व ग्रामीण भागातील नागरिक उतसेच उपअभियंता धर्मेंद्र झाल्टे,कनिष्ठ अभियंता विकास लोकरे पस्थित होते.

# दलित वस्तीच्या निधीचा गैरवापर

## बांधकाम अभियंता यांच्याकडून चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जळगाव जामोद तालुक्यातील सुनगाव येथील गट ग्रामपंचायत विविध कारणांमुळे नेहमी चर्चेत असते, सुनगाव ग्रामपंचायत ने लहुजी साळवे दलित वस्तीतील रस्त्याचा निधी दलित वस्तीत न करता त्या निधीचा सर्रास वापर सवर्ण जातीच्या वस्तीमध्ये केला आहे. तसेच बनावट व दिशाभूल करणारे दस्तऐवज तयार करून ग्रामपंचायतीने दलित वस्तीचा विकास निधीचा अपहार केल्याची तक्रार सुनगाव ग्रामपंचायतीचे माजी ग्रामपंचायत सदस्य यांनी कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा उपविभागीय अधिकारी जळगाव जामोद तहसीलदार जळगाव जामोद व गटविकास अधिकारी पंचायत समिती जळगाव जामोद यांना दिली आहे. लहुजी साळवे दलित वस्ती विकास निधी मधून पाच लक्ष मंजूर झालेले असताना ते काम सुद्धा दलित वस्तीत न करता जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळे समोरील रस्ता ते डांबर रोडपर्यंतचा रस्ता सवर्ण वस्तीत केल्या गेला हा सर्रास पणे दलित बांधवांवर अन्याय असून संबंधित अधिकारी व पदाधिकारी ग्रामपंचायतीच्या संगनमताने दृश्य भावनेने दलित वस्तीचा विकास थांबविण्यासाठी दलित वस्ती विकास निधीचा गैरवापर केला हा कायद्यानुसार गुन्हा असून या सर्व गोष्टी वेळोवेळी संबंधित अधिकारी व पदाधिकारी यांच्या लक्षात आणून देण्याकरिता माजी ग्रामपंचायत सदस्य यांनी प्रयत्न केले असता ते व्यर्थ ठरले. तसेच चुकीचे अंदाजपत्रक बनविणे व चुकीची माहिती देणे तसेच लहुजी साळवे दलित वस्तीचा विकास निधीचा वापर दलित वस्ती मध्ये ला करता सवर्ण वस्तीचा विकास म्हणून संबंधित अधिकारी पदाधिकारी यांच्यावर कारवाई करून सुनगाव येथील दलित बांधवांना न्याय मिळावा अशी तक्रार पांडुरंग गवइ यांनी केले होती त्यानुसार 21 एप्रिल 2023 रोजी पंचायत समीती बांधकाम अभियंता काळपांडे यांनी सदर रोडची चौकशी केली व आज दिनांक 24 4 2023 रोजी तक्रार करते पांडुरंग गवई यांनी गटविकास अधिकारी यांना तक्रार केली आहे की माझ्या तक्रारीचे निरसन झाल्याशिवाय सदर कामाचे देयके अदा करू नये व तसे केल्यास आपणा संबंधित पोलीस स्टेशन जळगाव जामोद येथे अ‍ॅट्रॉसिटी कायद्याप्रमाणे तक्रार दिली जाईल व गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जाईल.

# कन्नड शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा : संतोष पवार

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शहरातील प्रभाग क्रमांक २ आणि ५ मधील नाली (गटार), रस्ते यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, प्रभागात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला आहे. या बाबीकडे नगरपालिका प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी अशी मागणी शिवसेना (शिंदे गट) उप शहरप्रमुख संतोष नामदेव पवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात पालिका मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील प्रभाग क्रमांक २ आणि ५ मधील नाल्या (गटार) गेल्या अनेक दिवसांपासून तुंबलेल्या आहेत. त्यामुळे सांडपाणी,ड्रेनेजचे घाण पाणी दिवसेंदिवस साचल्याने प्रभागात मच्छर, डास आणि मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला आहे. यामुळे नागरिकांना स्वतःच्या घरात राहणे अवघड झाले आहे. नगरपालिकेचे सफाई कर्मचारी थातुर मातुर सफाई काम करुन जातात या मुळे नागरीकांन मध्ये आक्रोश दिसुन येत आहे प्रभागात सर्वत्र घाणीचे, दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्यातच या परिसरात मोकाट कुत्र्यांच्या मोठ्या प्रमाणात सुळसुळाट वाढला असून नागरीकांन मध्ये भितीचे वातावरण दिसुन येत आहे नगरपालिकेने तात्काळ कारवाई करुन परिसरातील नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. नगर परीषदेचे उपमुख्याधिकारी साळवे यांना निवेदन देताना संतोष पवार, मनोज देशमुख, संदिप घोंगते व इतरांनी उपस्थिती होती.



# महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या राज्य उपाध्यक्षपदी विठूभाऊ चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पक्षप्रमुख ऊध्दव ठाकरे यांच्या आदेशान्वे व शिक्षक सेनेचे राज्यध्यक्ष ज.मो.अभ्यंकर यांच्या शुभ हस्ते नांदेड जिल्यातील प्रभावी शिक्षक नेते शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय चळवळीमध्ये सदैव अग्रेणीय असलेले शिक्षकाच्या न्याय हक्कासाठी प्रखरपणे लढणारे आधी कर्तव्य आणि न्याय हक्कासाठी सदोदीत झगडणारे नांदेड जिल्ह्यातील प्रभावी शिक्षक नेते ताथा जि.प. प्रा.शा.भाद्रा ता.लोहा या शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक व विदयार्थी प्रिय शिक्षक विठुभाऊ चहाण यांची महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने या निवडीचे पत्र महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण संचालक तथा महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे राज्य अध्यक्ष मा. ज. मो. अभ्यंकर साहेब यांच्या शुभहस्ते प्रधान करण्यात आले.

तसेच या वेळी नांदेड जिल्हातील विविध पदाधीकाऱ्यांच्या नियुकत्या प्रदान करण्यात आल्या जिल्हा समनवयक पदी अनिरुद्र शिरसाळकर सर, जिल्हा मार्गदर्शक बळीराम पा.शिंदे जिल्हाऊपाध्यक्ष मुस्तफा शेख सर व जिल्हा सहसचिव बालाजी भांगे याची नियुक्ती करण्यात आली हा कार्यक्रम इंटरनॅशनल स्कूल पश्चिम गोरेगाव मुंबई येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या मुंबई विभागाचे अध्यक्ष अजित चहाण, नांदेड जिल्हयाचे अध्यक्ष संतोष अंबुलगेकर सर, जिल्हा सचिव रवि बंडेवार सर यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती. संघटना बळकट करण्यासाठी व शिक्षकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सदैव लढा द्या. त्यासाठी संघटना नेहमी खंबीरपणे तुमच्या पाठीशी असेल असा विश्वास राज्य अध्यक्ष मा.ज.मो. अभ्यंकर साहेब यांनी दिला.

# समुद्राच्या तळाशी जाऊन बाळ काळणे देत आहेत वन्यजीव वाचविण्याचा संदेश

आधुनिक केसरी न्यूज



**अकोला :** २४ एप्रिल रोजी सिंधुदुर्ग येथे समुद्राच्या तळातुन वन्यजीव वाचविण्याचा आगळा वेगळा संदेश सर्पमित्र तथा मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणेंनी दिला. विशेष म्हणजे तनमोर हा पक्षी जगात फक्त भारतात सापडतो. भारतातही फार मोजक्या ठिकाणी आहे. विशेष म्हणजे अकोला वाशिम जिल्हात पूर्वी जास्त दिसत होता. मात्र फार क्वचित दिसणारा हा पक्षी तर आता फारच दुर्मिळ झाला. याचे अस्तित्व टिकविण्यासाठी महाराष्ट्र वनविभाग सर्व बाजुने पुरेपुर प्रयत्न करत आहे. त्याला अकोला वनविभाग सातत्याने लक्ष घालुन साथ देत आहे. अकोलाचे मानद वन्यजीव रक्षक आपल्या आगळ्या वेगळ्या हिमती छंदातून समाज सेवेसाठी, निसर्ग संरक्षणासाठी नेहमीच चांगला संदेश देतात. मागच्या वर्षी ह्याच काळात समुद्राच्या मध्यभागी खोल पाण्यात जाऊन पोहणे व त्या ठिकाणी योगासने त्यांनी केले होते. त्यांची ही कृती आश्चर्य कारक ठरली. त्यांच्या या कृती संदेशाने कॅन्सर व अपंग व्यक्तिंचे उत्साह वाढुन अनेक पेशंटच्या तर जीवनातील कॅन्सर भीती नष्ट झाली. कारण बाळ काळणे यांनी कँन्सरच्या दोन ऑपरेशन मुळे 79% अपंगत्व आल्यावरही या आरोग्य स्थितीवर मात करीत हा समुद्री महाप्रयोग केला होता. तर सर्पसेवा वन्यजिव सेवा ही कॅन्सरवर व अपंगत्वावर मात करून अशा सर्वच धोकादायक सेवा आनंदाने व जिवाची बाजी लावत सुरुच ठेवल्या आहेत. अशा धाडसी सेवेबद्दल त्यांना वर्ल्ड ग्रेटेस्ट रेकॉर्ड व इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड हे दोन जागतिक सम्मान प्राप्त झाले आहेत. तर आता नुकतेच स्कुबा डायव्हिंग मध्ये समुद्रात वीस फुटाच्यावर खोल पाण्यात जावुन वन्यजिव संरक्षणातील अति दुर्मिळ झालेल्या तणमोर पक्षाचा वाचविण्याचा संदेश त्यांनी दिला आहे. समुद्री विक्रम अशा जर्जर आरोग्य स्थितीवर मात करणारे एकमेवअसल्यामुळे पुन्हा जागतिक सम्मानित पुरस्काराच्या उंबरठ्यावर ते आले आहेत. ही वन्यजीव सेवकांसाठी व अकोल्या साठी भूषणावह बाब आहे.

# वीज कोसळून मेंढपाळाचा मृत्यू; दोघे जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** परभणी जिल्ह्यातील पांगरी (ता. जिंतूर) येथे आज बुधवारी (दि.२६) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस, गारपीट झाली. वीज कोसळून एका मेंढपाळाचा मृत्यू तर दोन जखमी झाले. पांगरी येथे अचानक वादळी वाऱ्यासह सुरू झालेल्या गारपिटीत 17 वर्षीय मेंढीपालक गणेश जहाने याच्या अंगावर वीज कोसळून त्याचा मृत्यू झाला तर त्याच्यासोबत असलेले दोन तरुण गंभीर जखमी झाले. यात 19 वर्षीय बाळू लोणकर आणि 22 वर्षीय माधव मांदळे यांचा समावेश आहे. बुधवारी दुपारी 4 वाजल्यापासून ढगाळ वातावरण होते. अन त्यातच 4.30 वाजण्याच्या सुमारास अचानक सर्वत्र वादळी वारा सुटला होता. तालुक्यातील पांगरी येथे ठोकर गारांसह तुफान पाऊस व विजा पडायला सुरुवात झाली. यात पांगरी शिवारात 17 वर्षीय मेंढीपालक गणेश जहाने याच्या अंगावर वीज कोसळून मृत्यू झाला तर सोबतचे बाळू लोणकर आणि माधव मांदळे हे गंभीर जखमी झाले. मयत व जखमी तरुणांना ग्रामस्थांनी जिंतूर शहरातील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. पण वैद्यकिय अधिकाऱ्यांनी गणेश जहाने यास तपासून मृत घोषित केले. तर जखमींवर प्राथमिक उपचार करून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना परभणी येथे हलविण्यात आले आहे. या घटनेत काही मेंढ्या दगवल्याची चर्चा रुग्णालयात होती.



# अपघातात ३ महिला ठार, ३० जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** सिरोंचा तालुक्यातील चिटूर येथून शासकीय योजनांची जत्रा कार्यक्रमावरून ट्रॅक्टरने परत येत असताना झालेल्या अपघातात तीन महिला ठार, तर ३० जण जखमी झाल्याची घटना रंगधामपेठा चेक गावाजवळ घडली. शासनाने विविध योजनांचा लाभ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासकीय योजनांची जत्रा कार्यक्रम चिटुर येथे आयोजीत केला. या कार्यक्रमात विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी लक्ष्मीदेवपेठा येथील ३० जण ट्रॅक्टरमध्ये बसून चीटूरला गेले होते. कार्यक्रम आटोपून परत येत असताना बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास रंगधामपेठा चक गावाजवळ ट्रॅक्टर अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला उलटले. यात ट्रॅक्टरमध्ये बसलेले तीन वृद्ध महिला ठार तर ३० जण जखमी झाले. त्यांना तत्काळ अंकिसा प्राथमिक रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यातील १५ ते १६ जणांना सिरोंचा येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे. यातील जखमींची नावे कळली नसून हे सर्व जण लक्ष्मीदेवपेठा येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. सोयीच्या गावी हा कार्यक्रम घेणे शक्य असताना जिथे जाण्यासाठी रस्ता नाही अशा ठिकाणी कार्यक्रम घेण्याचा अट्टाहास कशासाठी, असा प्रश्न नागरिक विचारत आहे.



# बालविवाहमुक्त परभणीसाठी जिल्हाधिकारी यांची विशेष उद्बोधन कार्यशाळा



आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** बाल विवाह मुक्त परभणीच्या अनुषंगाने समाजामध्ये, बालक-बालिकांमध्ये जनजागृती व्हावी. तालुका आणि ग्राम बालसंरक्षण समिती, बालविवाह निर्मूलन समिती यांना प्रेरणा मिळावी आणि बालविवाह मुक्ती संदर्भाने प्रत्येक समिती सदस्याला नेमकेपणाने आपले कार्य समजावे. बालविवाहाला बळी पडणाऱ्या किशोरवयीन मुली यांना बालविवाहाचे दुष्परिणाम समजावेत आणि त्यांनी स्वतः बालविवाह विरुद्ध ठाम भूमिका घ्यावी. परभणी जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात, कोणत्याही गावात, कोणत्याही कुटुंबात बालविवाह होऊ नये परभणी जिल्हा हा संपूर्णपणे बालविवाह मुक्त व्हावा.

या उदात्त हेतूने जिंतूर तालुक्यामध्ये माऊली मंगल कार्यालय येथे भव्य स्वरूपात किशोरवयीन बालिकांची उद्बोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली.या कार्यशाळेत उदबोधन, प्रबोधन करण्यासाठी स्वतः मा. जिल्हाधिकारी श्रीमती आंचलजी गोयल ह्या उपस्थित होत्या. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात किशोरवयीन बालकांची सुसंवाद साधून जनजागृती करण्याचे महत्वपूर्ण काम कार्यशाळेच्या माध्यमातून मा. जिल्हाधिकारी श्रीमती आंचल गोयल मॅडम करत आहेत. या संवादाच्या मदतीने मुलींच्या मनातील प्रश्न आणि शंका दूर करण्यात आल्या. समस्या कोणतीही असो ती सोडवायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे सांगून मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले. तुम्ही सर्व मुली उद्याच्या अधिकारी आहात सकारात्मक राहून मनापासून अभ्यास करा अशा शुभेच्छा ही दिल्या. यासोबत किमान पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय कुठल्याही परिस्थितीमध्ये बालविवाह करायचा नाही. अशी खुणगाठ मनाशी घट्ट बांधून ठेवा. जिल्हाधिकारी म्हणून मी स्वतः आणि आमचे संपूर्ण प्रशासन बालविवाह थांबवण्याचा प्रयत्न करत आहेच सोबत तुम्ही सर्व मुलींनी ठरवले तर परभणी जिल्हा खात्रीने बालविवाह मुक्त होईल.उपविभागीय दंडाधिकारी श्रीमती अरुणा संगेवार मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये बालविवाहाची कारणे आणि दुष्परिणाम विशद केले. त्याचबरोबर जिल्हाधिकारी महोदयांच्या मार्गदर्शनानुसार प्रशासनाकडून सुरू असणाऱ्या उपायोजना विषयी सविस्तर माहिती सांगितली. परभणी जिल्ह्यात अनेक बालविवाह रोखण्यात आले. ही खऱ्या अर्थाने अभिनंदनीय बाब आहे. शासन प्रशासन बालविवाह थांबवण्यासाठी आपल्या परीने कसोशीने प्रयत्न करत आहे पण यासोबतच सर्व बालक-बालिका आणि त्यांच्या पालकाने ही जागृत होणे गरजेचे आहे. कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना गटशिक्षणाधिकारी गणेश गांजरे यांनी बालविवाह मुक्त परभणी च्या अनुषंगाने जिंतूर तालुक्यात सुरू असणाऱ्या कार्याविषयी माहिती सांगितली.

या कार्यशाळेमध्ये बालविवाह मुक्ती प्रतिज्ञा अनिल स्वामी यांनी उपस्थित सर्वांना दिली. या कार्यशाळेत उपस्थित मान्यवरांसोबत तहसीलदार अमित घाडगे गटविकास अधिकारी भाऊसाहेब थोरात गटशिक्षणाधिकारी गणेश गाजरे कधी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर जोशी यांनी केले तर आभार केंद्र प्रमुख मारुती घुगे यांनी मानले

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण कार्यशाळा संपन्न होण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, केंद्रप्रमुख, कर्मचारी बंधू-भगिनी, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक बंधू भगिनी आणि अंगणवाडी कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली.

# सिंदफणा पब्लिक स्कूल येथे ओरिएंटेशन कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** येथील सिंदफणा पब्लिक स्कूल येथे शाळेच्या सचिव मंगलाताई सोळंके आणि उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पालकांसाठी ओरिएंटेशन ( अभिमुखता ) कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

आपल्या प्रास्ताविक पर भाषणामध्ये शाळेचे उपप्राचार्य राहुल कदम यांनी पालक आणि शिक्षक यांची वैचारिक देवाण-घेवाण होणे गरजेचे आहे त्यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल असे प्रतिपादन केले. शाळा स्वागत सूचनेनंतर पालकांना शाळेच्या नियमांची माहिती तसेच विविध विषयांची माहिती देण्यात आली आणि पुढील वर्षात कोणते उपक्रम हाती घेतले जाणार आहेत याची सविस्तर माहिती प्रत्येक वर्गांचे वर्ग समन्वयक विजय फासाटे, संध्या नोकवाल, अजय सावंत, अनिल राठोड, सीमा शिंदे, साधना शेजुळ, अर्चना जाधव यांनी दिली. सह-शैक्षणिक क्रियाकलापांवर देखील चर्चा करण्यात आली ज्यामुळे पालकांना स्वतः निर्देशित केलेल्या अभ्यासक्रमाची कल्पना दिली ज्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशील प्रतिभा आणि उर्जेचा पूर्णपणे वापर करण्याचे माध्यम दिले. शाळेच्या समन्वयक नीला देशमुख यांनी पालकांना मार्गदर्शन करताना किशोरवयीन मुला-मुलींच्या समस्या व त्यावर




उपाय यावर सविस्तर मार्गदर्शन केले. सिंदफणा पब्लिक स्कूल चे प्राचार्य अन्वर शेख यांनी पालक आणि शिक्षक यांच्यातील प्रभावी संवादाचे फायदे याबद्दल विस्तृतपणे सांगितले. शाळेतील मुलांना उत्तम शिक्षण आणि विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी पालकांकडून समर्थन आणि सूचना मागितल्या आणि चांगल्या पालकत्वाविषयी काही टिप्स सामायिक केल्या जसे की वागणूक, परिणाम आणि बक्षीस प्रणाली. त्यांनी आपल्या लहान मुलांमध्ये कृतज्ञतेचे गुण असले पाहिजेत आणि ते दाखवले पाहिजे यावर भर दिला आणि उज्ज्वल भविष्यासाठी मजबूत पाया तयार करण्यासाठी प्रेम आणि काळजीने मुलाचे पालनपोषण करण्याच्या विविध मार्गांवर आधारित काही अनुभव देखील सांगितले. या ओरिएंटेशन साठी महिला पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिंदफणा पब्लिक स्कूलचे शैक्षणीक विभागप्रमुख जिबी ऑगस्टन, सुजा चाको, धनंजय सोमवंशी, देवेंद्र सोळंके ( बाळुकाका ), सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




# सांगोल्याच्या पाणी प्रश्नावर दीपक आबा आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** बुधवार दि. 26 रोजी निरा उजवा कालवा सल्लागार समितीची बैठक पुणे विश्रामगृह येथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यामध्ये सांगोल्याच्या पाणी प्रश्नाविषयी दिपकआबा आक्रमक झाले. यावेळी ते म्हणाले मैल 93 पासून सांगोला व पंढरपूर या तालुक्याला मिळणारा पाण्याचा प्रवाह हा नेहमीच पूर्ण क्षमतेचा राहत नाही याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पुरेसा कर्मचारी वर्ग तेथे उपलब्ध नसल्यामुळे पाणी वाटप करण्याचे नियोजन अतिशय ढिसाळ झालेले आहे. यामध्ये माजी आमदार दीपक आबांनी तालुक्यातील काही गावांना उन्हाळ्यामुळे पिण्याच्या पाण्याचा तुटवडा निर्माण झाला आहे सदर भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजनेला निरा उजवा कालव्यातून पाणी सोडण्याची आग्रही मागणी केली. या मागणीवर मंत्रिमहोदय,अधिकारीवर्ग यांच्याशी



सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीमध्ये प्रामुख्याने सांगोला व पंढरपूर विभागाचे प्रश्न अतिशय जिव्हाळ्याने मांडत असताना दीपक आबा चांगले आक्रमक झाले. पुढे ते म्हणाले की शासनाच्या विनंतीवरून सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांनी कालवा अस्तरीकरणाला इच्छा नसताना सुद्धा शासनाने यावेळी तुम्ही अस्तरीकरण करा तुम्हाला जास्तीचे पाणी देऊ असे आश्वासन दिले होते. या शासनाच्या विनंतीला मान देऊन शेतकऱ्यांनी अस्तरीकरणाला पाठिंबा दिला. हे अस्तरीकरण पूर्ण होऊन सुद्धा समाधानकारक गेज मैल 93 पासून पाण्याचा प्रवाह नेहमीच नियमित राहत नाही.वरच्या तालुक्यातील दिग्गज नेते मंडळीमुळे सतत आमच्या तालुक्यावर अन्याय होतो हा अन्याय आम्ही किती दिवस सहन करणार ? यापुढे कोणत्याही परिस्थितीत आम्ही आमच्या तालुक्यावरील अन्याय सहन करणार नाही असा आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर मंत्रिमहोदय व अधिकारीवर्ग यांनी सकारात्मक उत्तरे देऊन इथून पुढे हा अन्याय होणार नाही व सांगोला व पंढरपूर या दोन्ही तालुक्याला मिळणाऱ्या लाभाचे योग्य ते नियोजन केले जाईल असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

या बैठकीस पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी देशमुख साहेब, आमदार दत्तात्रय भरणे,आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार जगताप, आमदार रवींद्र धंगेकर, मुख्यअभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांच्यासह अनेक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# लग्नसराई, उन्हाळ्याच्या सुट्यांमुळे बसगाड्या हाउसफुल

## क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेत महामंडळाच्या गाड्या सुसाट

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** सध्या लग्नसराई व शाळांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागण्याच्या स्थितीत असल्याने एसटी महामंडळाच्या गाड्या प्रवाशांनी फुलून गेल्या आहेत यामुळे वाहन चालक पेक्षाही जास्त प्रवासी बस गाड्या बसवून सुसाट वेगाने गाड्या धावताना दिसत आहेत. इतिहासः तालुक्यात किती ठिकाणी तर प्रवाशांना खाली ठेवून गाड्या निघून जात असतानाचे चित्र सध्या तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाण्यासाठी मिळत आहे गाड्यांमधून प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त बसत असल्याने वाहन चालकाकडूनही प्रवाशांना दमदाटी केली जात आहे यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्याच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. सोयगाव तालुका हा जोडलेला असल्याने या तालुक्यातून छत्रपती संभाजीनगर,मुंबई, पुणे,अहमदनगर, सुरत बडोदा येथे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. यासह या तालुक्यातून या ठिकाणी जाण्यासाठी बस गाड्या मुबलक प्रमाणात उपलब्ध नसल्याने मिळेल त्या वाहनाने प्रवास करून प्रवासाचा टप्पा पूर्ण करावा लागत आहे अशावेळी सध्या लग्न सराई व शाळा लागलेल्या सुट्ट्यांमुळे प्रवासी मोठ्या प्रमाणावर बस स्थानकावर गर्दी करीत आहेत यामुळे बस गाड्यावर अधिकच्या प्रवाशांचा भार वाढलेला आहे पर्यायाने बस गळ्यातील वाहन चालक व वाहक मनमानी कारभार करून प्रवाशांना त्रास देण्याच्या प्रकारात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे यामुळे महामंडळाने वाढीव प्रवासाच्या हिशोबाने या मार्गावरील बस ग्रामीण भागात फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी प्रवाशांकडून व सरपंच रत्नाताई सुरेश चव्हाण घाणेगांव तांडा यांनी केली आहे. बस गाड्यांमधून प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळत नसल्या कारणामुळे कित्येक प्रवासी तालुक्यातून बाहेर जाण्यासाठी खासगी वाहनाचा आधार घेत आहेत यामुळे खाजगी वाहन चालक प्रवास भाडे वाढ करून प्रवाशांना सुविधा पुरवत आहेत. महामंडळाच्या कुचकामी धोरणामुळे तालुक्यातील खाजगी वाहन चालकांना अच्छे दिन आल्याचे चित्र पाहण्यासाठी मिळत आहे.

# महिलांच्या उपस्थितीने शासनावर दबाव वाढेल

## धोंडीराम राजपूत यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** पुढील महिन्याच्या १४ मे,रविवार रोजी छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा संस्कृतीक मन्डळ च्या मैदानावर वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह रजपूत महामेळावा होणार आहे. या मेळाव्याला केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह उपस्थित राहणार असून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरा शिंदे,उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. राजपूत समाज भटका असून ,अत्यंत मागास आहे, आर्थिक स्थिती बेताचीच आहे. त्यामूळे शिक्षण प्रमाण अत्यल्प आहे, म्हणून या समाजाचा समावेश राज्य सरकारच्या मागासवर्गीय यादीत विमुक्त जातीत करण्यात आलेला आहे, मात्र जातीचे प्रमाण पत्र मिळवताना विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात अडवनुक होत आहे, वैधता प्रमाण पत्र मिळण्यासाठी अडनुक आहे,नौकरित जे समाज बांधव व भगिनी आहेत त्याना ही चौकशी ला समोरे जावे लागत आहे, राजपूत /परदेशी समाज राज्यात खुप मोठ्या सन्खेने आहे, परंतू या समाजातील तळा गाळातील कौशल्य धारक युवकांना स्वताःच्या पायावर उभे राहुन स्वावलंबी बनण्यासाठी या समाजाच्या नावे आर्थिक विकास महामंडळ नाही.

या समाजाच्या विद्यार्थ्यासाठी राज्यात वस्तीगृह नाही, शासकीय शाळा नाही,या व ईतर मागण्या महामेळावा निमीत्ताने या बाबी शासनाच्या नजरेत आणुन द्याव्यात व या समाजावर होणारे अन्याय थांबावे व या समाजाचा मागासले पणा दूर व्हावा साठी हा मेळावा आहे. मातृशक्ती,नारी शक्ती एकवटली तर कोणत्याही शक्ती ला त्यांच्या समोर झुकावे लागते,असा आजपर्यंतचा इतिहास आहे,समाज क्रांतीचे रणशिंग महिलानी फुंकून या देशात अनेक बदललेले आहेत.महाराणी जयवंता देवी यांचे रणरागिणी रुप घेऊन राजपूत, परदेशी महिलांनी या मेळाव्यात लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे .




# हिमालयातील साहसी पदभ्रमंतीसाठी 'युवाशक्ती'कडून १५५ पुणेकर रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** हिमालय पर्वतरांगेतील मनालीमधील 'देवतीब्बा', धरमशालामधील 'त्रिवुंड-लाका ग्लेशीयर' आणि गढवालमधील 'हर की दून' अशा विविध ठिकाणी साहसी पदभ्रमंतीसाठी (ट्रेक) १५५ पुणेकर आज गुरुवारी दिल्लीकडे रवाना झाले. पदभ्रमणातील अग्रणी 'युवाशक्ती' संस्थेच्या वतीने विविध वयोगटातील १५५ ट्रेकर्सने हिमालयाकडे आगेकूच केली. नवनिर्वाचित आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुणे रेल्वे स्टेशन येथे या उत्साही ट्रेकर्सना भेटून शुभेच्छा दिल्या. कुठल्याही प्रकारच्या व्यसनांच्या आहारी न जाता पदभ्रमंतीचा व्यासंग जपल्याबद्दल धंगेकर यांनी ट्रेकर्सचे अभिनंदन केले. यावेळी युवाशक्ती संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजित साने यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. डॉ. अजित साने म्हणाले, "महाराष्ट्राच्या, प्रामुख्याने पुण्याच्या तरुणाईला निसर्गात भटकंती करण्याचा वारसा पूर्वीपासूनच आहे. कोरोनामुळे गेल्या दोन-तीन वर्षात ट्रेकिंगला काहीशी मरगळ आली होती. मात्र, पुन्हा एकदा तरुणाईची पावले निसर्गाच्या सान्निध्यात वळत आहेत. हिमालयातील साहसी पदभ्रमंती तरुणाईची पसंती आहे. मे आणि जून या पुढील दोन महिन्यांच्या कालावधीत अशा अनेकविध ट्रेकचे आयोजन होणार आहे.

# रानटी हत्तींचे गोंदिया जिल्ह्यात पुनरागमन

## नवेगाव बांध उद्यान, बसवोडन गावात अलर्ट जारी

आधुनिक केसरी न्यूज



**गोंदिया :** गेल्या वर्षी जिल्ह्यात धूमाकुळ घातलेल्या रानटी हत्तींच्या कळपाने पुनरागमन केले आहे. बुधवार, २६ एप्रिल रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पळसगाव ते सर्रेगाव परिसरात सायंकाळी एका गुराख्याला हत्तींचा कळप दिसला. पडताळणी केली असता जिल्ह्यातील सीमेवर कळपाचे लोकेशन दिसून आले. हत्तींचा कळप नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानाकडे जाण्याची शक्यता वनविभागाकडून वर्तविण्यात आली आहे. वनविभागाने या मार्गावरील बसवोडन गावात अलर्ट जारी केला आहे.

मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात रानटी हत्तींचा कळप गडचिरोली जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यात दाखल झाला होता. नवेगावबांध वन परिक्षेत्रांतर्गत कवठा जंगल परिसरात रानटी हत्तींनी बस्तान मांडले होते. याच कालावधीत हत्तींच्या कळपाने एका आदिवासी शेतकऱ्याला ठार केले होते. जवळपास १५ दिवस या परिसरात धुमाकूळ घातल्यानंतर नांगलडोह येथील आदिवासींच्या वस्तीवर हल्ला करून त्यांच्या घराची व इतर जीवनोपयोगी साहित्याची नासधूस करत हत्तींचा कळप गडचिरोली जिल्ह्याच्या दिशेने वळला होता. त्यानंतर रानटी हत्ती दूर निघून गेले होते. मात्र, गेल्या दोन ते चार दिवसांपूर्वी हे हत्ती पुन्हा गडचिरोली जिल्ह्यातील जंगलमार्गे गोंदिया जिल्ह्याच्या सीमेत दाखल झाले आहेत. २१ एप्रिल रोजी या हत्तींचे लोकेशन गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवरील गडचिरोली जिल्ह्यातील पुराडा वनपरिक्षेत्र, रामगड बीटमध्ये दिसून आले होते. बुधवारी सायंकाळी हत्तींच्या कळपाने जिल्ह्याची सीमा ओलांडली असून सध्या हे हत्ती जिल्ह्यातील पळसगाव व सर्रेगाव शिवारात असल्याची माहिती आहे. सावधगिरी म्हणून वनविभागाने नवेगाव बांध उद्यान आणि बसवोडन गावात अलर्ट जारी केला आहे. रानटी हत्तींच्या पुनरागमनामुळे शेतकऱ्यांमध्ये पुन्हा दहशत पसरली आहे. रानटी हत्तींच्या कळपाने जिल्ह्यात प्रवेश केला आहे. सद्यस्थितीत त्यांचे लोकेशन पळसगाव व सर्रेगावच्या मध्यभागी असून नवेगावबांध उद्यानाच्या दिशेने जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे बसवोडन ग्रामस्थांना दक्षतेचा इसारा देण्यात आला आहे. सध्याच कडक पहारा, बंदोबस्त ठेवण्याची आवश्यकता नाही.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर